www.newsletter.com

महापारेषण

# अभिव्यक्ती

जानेवारी-२०१२

वर्ष-७ अंक-१











## महापारेषण समाचार विशेषांक

संपादक :
सौ. अनुधारा सावंत
( जनसंपर्क अधिकारी )
E – mail : dymgr1hr@mahatransco.in

पत्रव्यव्हाराचा पत्ता :
संपादक,
महापारेषण समाचार,
प्रकाशगंगा इमारत,
महापारेषण कंपनी मर्यादीत,
प्लॉट नं. सी - ११, इ ब्लॉक,
बांद्राकुर्ला कॉम्पलेक्स
बांद्रे ( पूर्व ), मुंबई - ४०० ०५१.
( खासगी वितरणसाठी )

**Printed & Published by:**
PRO for Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Printed at : Hema Arts,**
121, Sagar Bldg, Prabhat Ind.
Estate & Residence Complex
Dahisar (E), Mumbai – 400 068

**Published at :**
PRAKASHGANGA,
PLOT No. C–11, E- BLOCK
**BANDRA (EAST), MUMBAI – 400 051**

# अनुक्रमणिका या अंकात ....

संवाद.......................................................०१
घडामोडी.....................................................०३
गौरव.........................................................०६

कविता
जीवन........................................................०७
विसावा......................................................०७
बिनतारी ऊर्जा.............................................०७
काश्मिर ....................................................०७
निसर्ग वर्णन...............................................०८
पोशिंदा.....................................................०८
आरसा - दृष्टी..............................................०९
महामानव असे होवुन गेले...............................०९
वेडा तो कावळा...........................................०९
निरोप.......................................................१०

लेख
वसुंधरेचे ऋण............................................ १०
आठवणींचा सोहळा...................................... ११
देव दुर्विलास.............................................. १२
जीवन.......................................................१३
मनुष्य परिस्थितीचोच दास नाही......................... १४
कल्पकता हवीचं........................................... १६
महिला सक्षमीकरण काळाची गरज,......................... १६
उन्नतीसाठीच हवाय, व्यक्तिमत्वविकास..................... १७

कथा
कावा....................................................... १८

अध्यात्म
तिर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।।...................... १९

**From the desk of CGM (HR)**...................२१

Article "The Energy Challenge" ..............२३
by CMD published in magazine
"Harmony"

# संवाद



प्रिय कर्मचारी बंधु-भगिनींनो

आपण आता आर्थिक वर्ष २०११-१२ च्या शेवटच्या तिमाहीत येऊन पोहोचलो आहोत. आर्थिक वर्षाची शेवटची तिमाही अतिशय महत्वाची असते कारण या काळात कंपनीच्या निर्धारित वार्षिक उद्दीष्टे व ध्येय्यांच्या पुर्तीबाबत आघाडी अथवा पिछाडीस कारणीभूत असलेल्या घटकांचा आढावा घेता येतो. या तिमाहीत, कंपनीची उद्दीष्टे जी की पुढे विभागपातळी, कक्षपातळी आणि शेवटी व्यक्तिगत पातळीपर्यंत पोहचविण्यात आलेली आहेत त्या सर्वांच्या पुर्ततेकरीता विशेष भर या कालावधीमध्ये देणे जरूरीचे असते. असे म्हटले जाते की, कंपनीची कामगिरी म्हणजे दुसरे तिसरे काही नसून त्या कंपनीमध्ये काम करणाऱ्या सर्व व्यक्तींच्या वैयक्तिक कामगिरीची गोळाबेरीज होय! म्हणजेच, कंपनीच्या यशामध्ये त्या कंपनीमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची भुमिका फार महत्वाची असते.

या वर्षीपासून वेतनगट १ व २ मधील सर्व अधिकाऱ्यांकरीता नवीन कार्य मुल्यमापन अहवाल पद्धती अंमलात आणली आहे. ही नवीन पध्दती सध्याच्या मुल्यमापनातील त्रुटी दुर करण्याकरीता सुरू केलेली आहे. ही नवीन पद्धत पारदर्शक, शास्त्रशुद्ध, ध्येयाधिष्ठीत आणि परस्पर सहमतीने निश्चित केलेल्या KRAs/KPIs वर आधारीत आहे. या पध्दतीमुळे नियंत्रण अधिकाऱ्यांना प्रत्येक कर्मचाऱ्याच्या प्रगतीबाबत आढावा घेता येतो व या पद्धतीतील KRAs/KPIs हे आधिक्य आधारीत (Weightage based) आहेत. या नवीन पद्धतीबाबत कर्मचाऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याकरीता कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करुन आपल्या मानव संसाधन विभागाने विशेष प्रयत्न केले आहेत.

मला आशा आहे की, आपणास नेमुन दिलेले KRAs/KPIs चांगल्याप्रकारे पुर्ण करण्यात आपण यशस्वी व्हाल व चांगले गुणांकन (Rating) संपादन कराल. परिणामी, आपल्या कंपनीलाही तिची व्यावसायिक उद्दीष्टे गाठण्यात यश मिळेल. माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, तुम्ही तुमच्या उद्दीष्टांवर लक्ष केंद्रीत करा, त्यातील तुमच्या आघाडी आणि / अथवा पिछाडीच्या कारणांची योग्य कारणमीमांसा करुन आवश्यकतेप्रमाणे आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करा. तुमच्यावर सोपविण्यात आलेली उद्दीष्टे उर्वरित वेळेत साध्य करणे कठीण वाटत असल्यास आपल्या वरिष्ठांशी संपर्क साधून त्यांच्याकडून मार्गदर्शन तसेच आवश्यकता असल्यास अधिकची साधनसामुग्री (Resources) प्राप्त करून घ्या. कार्यपुर्ती वर्षाच्या शेवटच्या घडीला अडचणींचा पाढा वाचून उद्दीष्टपुर्ती न होण्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न करू नका ते नैतिकतेला धरून होणार नाही. मी आपल्यातील प्रत्येकास नेहमीच आवाहन करीत असतो की, उत्तराचा भाग होण्याचा प्रयत्न करा, प्रश्नाचा नाही! मला वाटते की तुमच्यापैकी प्रत्येकाने यशस्वी व्हावे. ही पध्दती यासाठी सुरू केली आहे की, जी तुमची काळजी घेईल, तुम्हाला पुरेशी साधने पुरविल. या पध्दतीचा आपल्या प्रगतीसाठी कसा उपयोग करून घ्यावयाचा हे सर्वस्वी तुमच्या हाती आहे.

(पुढील मजकूर पान क्र. २४वर)

तुम्ही सहमत असाल की, एक कंपनी म्हणून यश प्राप्त करण्याकरीता आपल्याला सहकार्यपुर्वक आणि एकत्रीतरित्या प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. अनेक विभागांचे KRAs/KPIs हे परस्परांवर अवलंबून असतात. अर्थातच, ते एकमेकांच्या यश आणि अपयशाच्या प्रमाणावर प्रभाव टाकीत असतात. विभागाच्या किंवा वैयक्तिक कामगिरीचे मुल्यमापन करताना हा घटक जरी विचारात घेण्यात येत असला तरी प्रत्येकाने आपआपल्या परीने योग्य ती काळजी घेतली पाहिजे व शक्यतोवर योग्य त्या पुर्व-उपाययोजना करून जास्तीतजास्त उद्दीष्टपुर्ती कशी होईल याची काळजी घेतली पाहीजे.

विभागपातळीवर तर KRAs/KPIs मधील हे परस्परावलंबीत्व सर्वात जास्त असते. कंपनीच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास कंपनीतील सर्व विभागांनी त्यांची उद्दीष्टे पुर्ण करणे आवश्यक बनते. तेव्हाच महापारेषण कंपनीची व्यावसायिक उद्दीष्टे खऱ्या अर्थाने साध्य होतात. आपल्या कंपनीमध्ये मुख्यत्वे चार विभाग आहेत; संचालन व सुव्यवस्था, प्रकल्प, वित्त व लेखा आणि मानव संसाधन. प्रत्येक विभागास वर्षाआरंभी त्यांचे KRAs/KPIs ठरवून देण्यात आले आहेत व त्यामध्ये राज्य पारेषण उपयोगीता (STU) व SLDC सुध्दा समाविष्ट केले आहेत. प्रत्येक विभागाची ध्येय्य व उद्दीष्टे ही वेतनगट १ व २ मधील प्रत्येक अधिकाऱ्यापर्यंत विभागून दिलेली आहेत. वर उल्लेख केलेल्या नवीन मुल्यमापन पद्धतीनुसार विभागप्रमुख पातळीवर अर्धवार्षिक आढावा (Mid-Year Review) घेण्यात आला आहे. माझ्या माहितीनुसार, अर्धवार्षिक आढाव्यानुसार सर्व विभागांची प्रगती समाधानकारक आहे. मला आशा आहे की, ३१ मार्च २०१२ नंतर वार्षिक आढावा (End-Year Review) देखील घेण्यात येईल. वर्ष संपल्यानंतर पंधरवड्याच्या आत ही वार्षिक आढाव्याची कार्यवाही पुर्ण होणे आवश्यक आहे. वार्षिक आढाव्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर शास्त्रीय पद्धतीने प्रत्येकाच्या कामगिरीचे गुणांकन काढले जाईल व ते संबंधितांना कळविण्यात येईल.

कंपनीची कामगिरी उत्तरोत्तर उंचावण्यासाठी नवनवीन प्रयोग करणे, उपक्रम राबविणे यामध्ये आपण नेहमीच अग्रस्थानी राहीलो आहोत. नवीन मुल्यमापन अहवाल पद्धती, ERP, बक्षीस योजना (Reward Scheme), क्षेत्रिय प्रशिक्षण केंद्रे आणि अभिनव प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी ही त्यादिशेने उचललेली काही ठळक पाऊले आहेत. आपल्या कंपनीची कामगिरी अधिक चांगली करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेऊनच आपण या बाबी केलेल्या आहेत. एक आदर्श राज्य पारेषण उपयोगिता बनणे हे आपले ध्येय्य आहे, त्यामुळे आपण आत्मसंतुष्ट राहून चालणार नाही. आपल्याला आपली कामगिरी सातत्याने उंचावत नेणे आवश्यक आहे तेव्हाच आपण इतर राज्य पारेषण उपयोगितांसमोर आदर्श ठेऊ शकू.

मला खात्री आहे की तुम्ही सर्वजण वरिष्ठ व्यवस्थापन व मला सहकार्य कराल व आपल्या कंपनीला आदर्श कंपनी बनविण्याच्या आपल्या स्वप्नाच्या पुर्ततेसाठी तुमचे KRAs/KPIs साध्य होण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न कराल.

सदिच्छांसह.

अरविंद सिंह

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## अउदा चाचणी विभाग, पनवेल कार्यालय कार्यान्वीत

अति उच्च दाब वाहिनीवरून ठाणे व रायगड जिल्हयात होणारा वीज पुरवठा खंडीत झाल्यास शीघ्रगतीने कारवाई होणे आवश्यक असल्याने दोन्ही जिल्हयांना सोयीस्कर अशा ठिकाणीच पारेषण विभागाचे चाचणी विभाग कार्यालय



असणे ही सध्या स्थितीत आवश्यक असल्याने कळवा येथील चाचणी विभाग, पनवेल येथे हलविण्यात आला असून चाचणी विभागातील अधिकारी आता ठाणे व रायगड जिल्हयातील एस.टी. कंझ्युमर्सना परीणामकारकरित्या सेवा देतील अशी खात्री असल्याचे प्रतिपादन वाशी परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.प्रभाकर देवरे यांनी केले. त्यांनी पनवेल येथील चाचणी विभाग कार्यालयाचे उद्घाटन केले त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी महापारेषण मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री.



चंद्रकांत भोसले, श्री. अनिल कोलप श्री.शरदचंद्र आवळीकर व श्री.पीयुष शर्मा, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग, पनवेल हे उपस्थित होते.

मागील काही वर्षे कळवा स्थित चाचणी विभाग, पनवेल येथे हलवावे जेणेकरून रायगड जिल्हयातील पोलादपूर, महाड, श्रीवर्धन सारख्या तसेच ठाणे जिल्हयातील पालघर सारख्या ठिकाणी वीजपुरवठा बाबतच्या तक्रारीबाबत शीघ्रगतीने कारवाई करणे शक्य होईल. या कामास मुख्य अभियंता, वाशी या पदावर श्री.प्रभाकर देवरे रूजू झाल्यानंतर वेग घेतला व त्याचे फलीत म्हणजे चाचणी विभागाचे कार्यालयाचे उद्घाटन पनवेल येथे झाले आहे. चाचणी विभागाचे कार्यालय पनवेल येथे सुरू झाल्यामुळे चाचणी विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी व तांत्रीक कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्याशी संपर्क साधता त्यांनी सांगितले की, "आम्ही आता दोन्ही जिल्हयांना न्याय देवू शकतो." चाचणी विभागाच्या कार्यालयाचे काम केवळ ३ महिन्यात पूर्ण करून कर्मचाऱ्यांना सुसज्ज ऑफिस उपलब्ध करून देणाऱ्या स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. अविनाश कसबेकर यांचे मुख्य अभियंता यांनी कौतुक केले.

## २२० केव्ही उपकेंद्र निवळीफाटा येथे १०० एम.व्ही.ए. रोहीत्र कार्यान्वित



रत्नागिरी शहरास अखंडीत व योग्य दाबाचा विद्युत पुरवठा व्हावा, या दृष्टीने २२० केव्ही उपकेंद्र निवळीफाटा जि. रत्नागिरी येथे २२०/१३२ - ११० केव्ही, १०० एम.व्ही.ए. क्षमतेचे विद्युत रोहीत्र कार्यान्वित करण्यात आले. निवळीफाटा येथील नविन रोहीत्र कार्यान्वित झाल्यामुळे व रत्नागिरी शहरास विज पुरवठा करणाऱ्या विज वाहीनीची लांबी कमी झाल्यामुळे तांत्रिक बिघाड हा कमीत कमी वेळात शोधता येणे शक्य झाले आहे.

श्री.जी.टी.मुंडे, मुख्य अभियंता कराड यांचे मार्गदर्शनाखाली तसेच श्री. पटेल साहेब, अधीक्षक अभियंता कोल्हापुर, बांधकाम विभाग कोल्हापुर, स्थापत्य विभाग रत्नागिरी, चाचणी विभाग रत्नागिरी यांचे सहकार्याने नविन विद्युत रोहीत्र कमीत कमी वेळात सुरु करण्यास यश मिळाले.

रोहीत्र उभारणी कमीत कमी वेळात करून रोहीत्र कार्यान्वित केल्याबद्दल श्री.जी.टी.मुंडे, मुख्य अभियंता यांनी कार्यकारी अभियंता श्री.पी.के.धोत्रे, यांचे अभिनंदन केले.

## आंतर मंडलीय क्रीडा स्पर्धा २०११-१२ पोलीस परेड ग्राउंड विश्राम बाग, सांगली येथे संपन्न



अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल कराड तर्फे कर्मचाऱ्यांना क्रीडा क्षेत्रातील कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी या उद्देशाने पोलीस परेड ग्राउंड विश्रामबाग, सांगली येथे आंतर मंडलीय क्रीडा स्पर्धा दिनांक २६-११-२०११ ते २८-११-२०११ रोजी संपन्न झाल्या. आंतर मंडलीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन श्री. किरण (नाना) सिंहासने, अध्यक्ष, महाराष्ट्र वेट लिफटींग असो. यांच्या शुभ हस्ते व श्री. जी. टी. मुंडे, मुख्य अभियंता अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल, कराड यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात



आले. सदर स्पर्धेमध्ये अउदा संवसु मंडळ, कोल्हापूर व चाचणी व दुरसंचरण मंडल, कराड येथील खेळाडूंनी भाग घेतला.

आंतर मंडलीय क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दिनांक २८.११.२०११ रोजी दुपारी ०४.०० वा. डॉ. श्री. रविंद्र शिसवे, पोलीस अधीक्षक सांगली यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. सदर क्रीडा स्पर्धेचे आयोजन श्री. सी. व्ही. पाटील, कार्यकारी अभियंता तथा कार्यकारणी सदस्य व श्री. एस. आर. जाधव, सहा. अभियंता तथा क्रीडा सचिव यांनी केले.

## भारतीय कामगार सेना व स्थानिय लोकाधिकार समिती आयोजित "लोकाधिकार करंडक २०११" भव्य क्रिकेट स्पर्धा संपन्न



दि. २४-१२-२०११ रोजी दहिसर स्पोर्टस क्लब, दहिसर (पूर्व), मुंबई येथे भारतीय कामगार सेना व स्थानिय लोकाधिकार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने "लोकाधिकार करंडक २०११" भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन कर्नल श्री. राहुल गोवर्धन, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) वितरण कंपनी यांचे हस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी शिवसेना नगरसेवक श्री. परशुराम (छोटु) देसाई तसेच श्री. प्रविण बागुल, व्यवस्थापक (मा. सं.) वितरण कंपनी हे उपस्थित होते.

सदर क्रिकेट स्पर्धेत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपनीतील कर्मचाऱ्यांनी उत्फूर्तपणे सहभाग घेऊन सहकार्य केले. स्पर्धेमध्ये प्रकाशगंगा "ब" संघ विजेता ठरला व उपविजेता संघ प्रकाशगड ४ था माळा ठरला. सदर संघांना अनुक्रमे रू. ३५००/- व रू. २५००/- रोख रक्कम व आकर्षक चषक देवून गौरविण्यात आले. त्याच ठिकाणी पुढीलवर्षी सेवा निवृत्त होणाऱ्या संघटनेच्या सदस्यांचा सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास भारतीय कामगार सेनेचे युनिट कार्याध्यक्ष श्री. राजन भानुशाली व श्री. मनोहर देशमुख, उपसेक्रेटरी श्री. अशोक साळुंखे, पारेषण कं., श्री. विनायक जाधव, भा. का. सेना कार्यकारिणी सदस्य, श्री. शशिकांत झोरे, सिनेट सदस्य मुंबई विद्यापीठ हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मुंबई परिमंडल युनिट अध्यक्ष श्री. गोपीनाथ जगताप यांनी केले. या कार्यक्रमास श्री. सुधाकर रेणोसे, सचिव मुंबई परिमंडळ, श्री. अशोक गायकवाड, प्रमुख मार्गदर्शक, श्री. प्रशांत भोवड, खजिनदार, श्री. तुळशीदास कांबळे, श्री. विलास जाधव, श्री. अशोक कदम, श्री. शेखर धुपकर, श्री. विनायक रामाणे, श्री. कृष्णकांत पराडकर, श्री. अरूण चैतावडेकर, श्री. सुभाष शेट्टी, श्री. रविंद्र आंग्रे, श्री. विठ्ठल सोनावणे, श्री. डी. एस. पाटील, श्री. पुरूषोत्तम रणभोर, श्री. महादेव साळुंखे यांनी बहुमुल्य सहकार्य केले.

## अउदा बांधकाम-नि-संवसु परिमंडल, वाशी अंतर्गत आंतर मंडलीय क्रिडा स्पर्धा संपन्न




अउदा बांधकाम-नि-संवसु परिमंडळ, वाशी अंतर्गत सन-२०११-१२ च्या आंतरमंडलीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन मुख्य अभियंता श्री. प्रभाकर देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०५.०१.२०११ ते दि. ०७.०१.२०१२ या कालावधीमध्ये यशस्विरित्या पार पाडण्यात आल्या.

सदर क्रिडा स्पर्धा कळवा संकुल, ऐरोली येथील मैदानावर घेण्याचे निश्चित झाल्यानंतर मुख्य अभियंता, श्री. प्रभाकर देवरे यांनी वैयक्तिक रित्या सदर प्रकरणी लक्ष घालुन स्थापत्य विभागाचे अधिक्षक अभियंता, श्री. नरेंद्र रामटेके तसेच कार्यकारी अभियंता (स्था), श्री. शरद लोखंडे व त्यांचे सहकारी यांचेकडून अत्यल्प वेळात मैदानाचे नुतनीकरण व सुशोभीकरण करून घेण्यात आले, सदर मैदानाचे "उर्जा क्रिडा नगरी" असे नामकरण करण्यात आले.

आंतरमंडलीय क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन श्री. उत्तम झाल्टे, संचालक (संचलन) यांचे शुभहस्ते करण्यात आले. सदर प्रसंगी श्री. प्रभाकर देवरे, मुख्य अभियंता, वाशी श्री. होटे, मुख्य अभियंता, राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली श्री. राऊत, मुख्य अभियंता (मासं), सांघीक कार्यालय, मुंबई, सर्व अधिक्षक अभियंते आणि कार्यकारी अभियंते उपस्थित होते. प्रमुख अतिथी श्री. उत्तम झाल्टे यांनी सदर क्रिडा स्पर्धेव्दारे विविध स्तरावरील तसेच निरनिराळ्या कार्यालयातील कर्मचा-यांनी एकत्र आल्यामुळे निर्माण होणा-या सांघिक भावने व्यतिरिक्त विचारांची देवाण घेवाण होत असल्यामुळे अशा प्रकारचे उपक्रम निश्चितपणे कंपनीच्या प्रगतीच्या दृष्टीने फलदायी ठरतात असे नमुद केले. क्रिडा संकुलाचे नामकरण व त्यातून निर्माण झालेली उर्जा या शब्दातील गर्भित प्रेरणा अतिशय समर्पकपणे अंमलात आणल्याबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुकाचा वर्षाव केला.

सदर क्रिडा स्पर्धेमध्ये सहभाग घेणा-या कंपनीच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचा उत्साह व वयोमर्यादा लक्षात घेता तसेच कोणत्याही खेळाडुस खेळतांना काही इजा झाल्यास तातडीने वैद्यकिय उपचार/प्रथमोपचार प्राप्त होण्याकरिता विशेष दक्षता म्हणून मुख्य अभियंता, श्री. प्रभाकर देवरे यांचे सूचनेनुसार डॉ. महाजन हॉस्पिटल यांचे सहकार्याने संपूर्ण कालावधीसाठी रुग्णवाहीकेची तसेच डॉक्टरांची प्रथमोपचार देता येण्यासाठी व्यवस्था करण्यात आली.

क्रिडा स्पर्धेचे कार्याध्यक्ष या नात्याने अधिक्षक अभियंता श्री. अनिल कोलप यांनी आयोजनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडल्यामुळे मुख्य अभियंता श्री. प्रभाकर देवरे यांनी वैयक्तिकरित्या समाधान व्यक्त केले व सदर स्पर्धेमध्ये सहभागी होऊन सर्वच स्तरावरील कर्मचा-यांनी खेळाडू/प्रेक्षक या नात्याने दिलेल्या प्रतिसाद व सहकार्य यांच्या पाठींब्यावर स्पर्धा यशस्वी करणे शक्य झाल्याचे नमुद केले. या प्रसंगी मुख्य अभियंता तसेच अन्य उपस्थित अधीक्षक अभियंते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

सदर क्रिडा स्पर्धेसाठी समन्वयक या नात्याने मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे या क्रिडा स्पर्धेच्या उद्घाटन व समारोप समारंभाची शान वाढली.

क्रिडा स्पर्धेच्या समारोपाचे वेळी बक्षिस वितरणाचा कार्यक्रम संचालक



(प्रकल्प) श्री. एम्पाल साहेब यांचे शुभहस्ते तसेच मुख्य अभियंता श्री. होटे व श्री. देवरे आणि श्री. आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) यांचे उपस्थितीत पार पाडण्यात आला. क्रिडा स्पर्धेच्या समारोपाच्या अगोदर श्री. एम्पाल साहेब यांनी इच्छा प्रदर्शित केल्यानुसार कब्बडी चा अंतिम सामना त्यांचे उपस्थितीत पार पाडण्यात आला. या आंतर मंडल क्रिडास्पर्धेमध्ये अउदा संवसु मंडल, कळवा यांनी सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

श्री. अनिल कोलप, अधिक्षक अभियंता यांनी आभार प्रदर्शन केले. पुढील आंतर मंडलीय क्रिडास्पर्धांचे यजमानपद श्री. चंद्रकांत भोसले, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, पनवेल यांना देण्यात आले. आंतर परिमंडलीय क्रिडा स्पर्धेसाठी यशस्वी ठरलेल्या सर्व क्रिडापटूंना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या व दि. ०७.०१.२०१२ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता सदर स्पर्धेची सांगता राष्ट्रगीत गायनाने करण्यात आली.

## जिजाऊ माँसाहेब जयंती



दि. १२ जानेवारी २०१२, रोजी मुख्यालयात. "जिजाऊ माँसाहेब जयंती" साजरी करण्यात आली, श्री. झाल्टे साहेब संचलाक (संचलन) यांनी जिजाऊ मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जिजाऊ मातेच्या शिवरायाला घडविण्यामागील प्रयत्नाचा उल्लेख केला. प्रत्येक पराक्रमी पुरूषांच्या जीवनाचे ध्येय एकच असते जे पारर्तंत्र्यात आहेत त्यांना स्वातंत्र्य मिळवून देणे ही त्यानी शिवरायंना दिलेली शिकवण होती.

शिवरायाच्या मनात कतृत्वाची ठिणगी टाकतानाच त्यानी त्यांना राजनितीही शिकवली, त्यांनी स्वत:तील खंबीरपणा व कर्तव्याची जाण हे दोन गुण शिवरायांत पूर्णपणे उतरविले होते. या महान मातेला मुख्यालयातील उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी पुष्पांजली वाहिली.

## योगेश म. देवतळे यांस "राज्य पुरस्कार प्रमाणपत्र" प्रदान



### गौरव

अ.उ.दा. (सं.व.सु) विभाग वर्धा, मंडळ चंद्रपूर अंतर्गत १३२ के.व्ही. विद्युत उपकेंद्र देवळी येथे कार्यरत असलेल्या सौ. योगिता म. देवतळे, कनिष्ठ तंत्रज्ञ यांचा मुलगा योगेश म. देवतळे वर्ग ९ वा यांस सन् २०१०-११ या वर्षी स्काऊट्स आणि गाईड्स कडून राज्यस्तरीय चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले "राज्य पुरस्कार प्रमाणपत्र" प्रजासत्ताक दिनाचे (२६ जानेवारी २०१२) औचित्य साधून त्यांचा मुलगा शिकत असलेल्या "रत्नीबाई विद्यालय वर्धा" येथील शाळा प्रशासना तर्फे प्रदान करण्यात आला आहे.

त्यांच्या निवडीबद्दल महापारेषण कंपनी तर्फे त्याचे अभिनंदन!

## नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती



प्रकाशगंगा मुख्य कार्यालयात दि. २३ जानेवारी २०१२ रोजी "नेताजी सुभाषचंद्र बोस" जयंती उत्साहात साजरी केली.

याप्रसंगी, श्री. अरविंद सिंह, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलीत करण्यात आला. श्री. अरविंद सिंह साहेबांनी, नेताजीच्यां देशासाठीच्या कार्याबद्दल उल्लेख केला. श्री. झाल्टे साहेबांनी त्यांच्या बद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रेसर नेते होते. ते "नेताजी" या नावांने ओळखले जातात, दुसरे महायुद्ध सुरू असताना इग्रंजाशी लढण्यासाठी त्यांनी "आझाद हिंद फौज" स्थापन केली. त्यांनी दिलेला "जय हिन्द" चा नारा भारताचा राष्ट्रीय नारा बनला. त्या "नेताजी सुभाष चंद्र बोस यांना उपस्थित अधिकारी/ कर्मचारी वर्गाने आदरांजली वाहिली.

## "प्रजासत्ताक दिन" प्रकाशगंगा येथे संपन्न



भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस "राष्ट्रीय दिन" म्हणून साजरा केला जातो. जवाहरलाल नेहरूनी २६ जानेवारी १९३० रोजी लाहोर अधिवेशनात तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची घोषणा केली.

मा. श्री. अरविंद सिंह अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी, २६ जानेवारी २०१२ रोजी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांच्या समवेत प्रकाशगंगा इमारतीच्या प्रांगणात राष्ट्रध्वज फडकविला व राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

## जीवन

जीवन रूपी हिऱ्याची पारख स्वत:च करायची असतं ।
मनुष्य जन्म पुन्हा मिळेल याच कुणाला माहिती नसतं.
वीणेच्या तारेवर मर्यादा ठेवल्यास सुंदर संगीत उमटतं ।
मर्यादा पार केल्यास त्यातनं संगीत बेसूर निघतं ।
जीवनाच सुद्धा काही सगळ असच असतं ।
संयम पाळुन जीवन सुंदर बनवायचं असतं ।
जीवनात फक्त सामाजिक साधना करून भागत नसतं ।
एकमेकाबद्दल समभाव ठेवून मनी उतरायच असतं ।
भौतिक सुखात जीवन समृद्ध झालेल दिसतं ।
अनेक समस्या निर्माण झाल्या अस जग बघून वाटतं ।
दया, शांती, करूणा व प्रेम आत्म्यातच असाव लागतं ।
क्रोध, मान, माया व लोभ यात गुरफटून जायच नसतं ।
जीवन जगत असतांना अनेक समस्यांना तोंड द्यायच असतं ।
नियम व मर्यादेचे पालन करून जीवन घडवायच असतं ।

श्री. वसंत के. मस्के
कनिष्ठ तंत्रज्ञ
१३२ के. व्ही. उपकेंद्र, भेंडाळा, विभाग-त्र्यंबकेश्वर

## विसावा

या तुच्छ जीवनाला इतकाच वर मिळावा
सेवेत शोषितांच्या बस देह हा झिजावा
निर्व्याज ती नजर दे डोळ्यास मज अशी की
... भगवा, निळा नि हिरवा मज सारखा दिसावा
येताच ती उजळतो हा आसमंत ऐसे
साक्षात चंद्र जैसे आकाशिया निघावा
जग दूरचे खरोखर दारी जरूर आले
पण आपसी दुरावा केव्हां इथे मिटावा ?
सोसून लाख कष्टे जग दाविले मला तू
आई खरेच ऋण हा कैसे तुझा फिटावा ?
वस्ती खरेच जर ती तू जाळलीच नाही
मग धूर सारखा हा तेथून कां निघावा
जमलेत आप्त सारे छळण्या मला इथेही
सरणावरी जरा मी जो घेतला विसावा.

मसुद पटेल
ज्युनियर टेक्नीशियन
२२० के. व्ही. सब/स्टे. पुसद

## विनतारी ऊर्जा

एम. झेड दुपट्टे



असाही एक दिवस, उदयास येईल
बिनतारी ऊर्जा, घरोघरी जाईल
रेडिओ शोधक, ते मार्कोनी आले
चुंबकीय लहरीचे, शोधकर्ता झाले
पावलाकडे त्यांच्या, सारे जग पाहिल ।। १ ।।
पृथ्वीला प्रदर्शना, मारून येते सात
अशी गती लहरीची, एका सेकंदात
पसरलेला पसारा, जागीच राहील ।। २ ।। बिनतारी
एक पाउल पुढे, जॉन बेअर्ड आले
दुरदर्शन वाहीनीचा, शोधकर्ता झाले
संदेश वाहतो, तर माझे चित्र वाहील ।। ३ ।। बिनतारी
मोबाईल, टि. व्ही. काम्प्युटर आले
तारेच्या मार्गाला, विसरून गेले
फ्रिक्व्हेंशी केंद्राची , निर्मीती होईल ।। ४ ।। बिनतारी
शॅटिलाईट आणि, पेस मधील यॉन
विद्युत तरंग पृथ्वीसी, जोडतो कमान
तारेसारखा लहरीतुन, इलेक्ट्रॉन वाहील ।। ५ ।। बिनतारी


एम. झेड दुपट्टे
कनिष्ठ तंत्रज्ञ , दुरसंचार उपविभाग वर्धा

## ।। काश्मिर ।।

काश्मिर प्रश्न एकदाच मिटवा
सारा देश क्रांतीने पेटवा
जर का आला एखादा शत्रु आडवा
तर त्याला दाखवा भारतीय स्वभाव कडवा
वीर जवान आहे मनाचा दिलदार
सोडून गेला आपुले घरदार
भारत मातेच्या रक्षणासाठी शौर्याने लढला
लढता लढता अमर होवूनी धारातीर्थ पडला.
जबरदस्त करूनी गोळीबार सारा
एक एक करूनी शत्रुला मारा
पाजून टाका त्याला शेवटचपाणी
जिवंत नाही राहिला पाहिजे असा अतिरेकी कुणी
जर का राहिलाच एखादा मुखडा
तर तो हिंदुस्तानातच मागेल तुकडा

श्री. विश्वनाथ भागुजी गभाले
सिनियर ऑपरेटर
२२० के. व्ही. उपकेंद्र, लोणंद ता. खंडाळा जि. सातारा

## निसर्ग वर्णन



भंटिडा नंतर निसर्गाच्या सानिध्यात
कॉलिंगपोंग सारख्या सुंदर शहरात
तिस्ता नदी वाहते दिमाखात ।। १ ।।
सिक्किम, गंगटोक, दार्जिलिंग
कॉलिंगपोंग शहरांचे डार्लिंग ।। २ ।।
सुंदर सुंदर फुलांचे गालिचे मखमली
पाईनवृक्ष त्याव भर घाली ।। ३ ।।
कॅक्टसची पाहून सुंदर फुले
उदास मन आनंदाने डुले ।। ४ ।।
क्षणात ऊन क्षणात पाऊस आणि थंडीचा गारवा
मनाला उल्हास देई ढगातील पारवा ।। ५ ।।
पाहून बर्फाच्छादित कांचनजंगा शिखर
अजून उल्हासित होई मनातील नजर ।। ६ ।।
सिक्किम मधील सुंदर सेंगोलेक, बाबा मंदिर व बर्फाच्छादित डोंगर
त्यात मनाला भुरळ घाली नथूला बॉर्डर ।। ७ ।।
निसर्ग सुशोभित झाकरी फॉल
रोपवे मधून दिसतो एम. जी. मॉल ।। ८ ।।
पेलिंग लाचूमलाचेन युमथांग
तेथील बर्फाच्छादित डोंगर व फुलांचे ताटवे घेवात मनाचा थांग ।। ९ ।।
कॉलिंगपोंगमध्ये कृष्णाचे मंगलधाम
नामचिमध्ये बारा ज्योतिर्लिंग व चारधाम ।। १० ।।
दार्जिलिंगमध्ये सनराईजचे मनमोहक दर्शन
समोर पहावे तर कांचनजंगावर किरणांचे रिफ्लेक्शन ।। ११ ।।
ढळता ढळता दिन दिसती निळ्या आकाशातील ढगांच्या बटा
त्यात भर घालती मावळत्या सूर्य किरणांच्या मनमोहक छटा ।। १२ ।।
दार्जिलिंगच्या रानीत बसून दिसतात चहाचे मळे
सुंदर पक्षांचे सानिध्य आहे मिरिकचे तळे ।। १३ ।।
पावसाळी पिकनिक करतांना दार्जिलिंग डोंगरात धबधबे दिसती सुंदर
पिकनिकची मजा लुटतांना मनाला येतो बहर ।। १४ ।।
रंगीन तिस्ताचा त्रिवेणी संगम तिस्ता गावात
तरूणाई घेते रिवर-राफटिंगचा आनंद जोशपूर्ण उत्साहात ।। १५ ।।
लाँग ड्राईव्ह करून डोसाची चव घ्यायला पोहचतो सिंगधामला
गाण्याबरोबर पार्टीची मजा व चायनीजची गोडी येते किंगधामला ।। १६ ।।
पाहुण्यांचे स्वागत व आदरातिथ्य केले जाते आय. बी. मध्ये,
तेथील फुलांचे सौंदर्य व सुवास सदैव राहिल मनामध्ये ।। १७ ।।
दोन वर्ष राहिलो सुंदर कॉलिंगपोंगमध्ये उल्हसात
आठवणी राहिल्या घर करून मनात ।। १८ ।।
कॉलिंगपोंग निसर्गाचे बदलते स्वरूप
कॉलिंगपोंग स्वर्गाचे दुसरे रूप
मुंबईला निघालो घेऊन नवा हुरूप ।। १९ ।।

दिपाली गायकवाड (पुणे)

## पोशिंदा



तुज जागे करण्या कोंबडा बघ अरवला
अंकुरांस उब देण्या जणू सूर्य उगवला
पीकास तुझ्या पाऊस धो-धो कधी रिमझीमला
तुझ्या राणीचा जीव कसा पाट काढण्यात रमला
चंद्र बघ सवे चांदण्या घेवून आला
राखण्या शेत तुझे कसा राखणदार झाला
तुच उगवशी घामातून मोती
त्याचा भलतेच घेताहेत फायदा
जीवाचे करून रान तूच उगवलं सोनं
तुझं सोनं विकण्याचा तिसरेच काढी कायदा
कृषीस केले प्रधान, तु फक्त नावाचा राजा
तू ना दीन जनता, हे दलाल खाती मलिदा
तुझाच हा राष्ट्र सारा तूझीच असो चालती
पांढरे दलाल नव्हे तूच खरा देशाचा पोशिंदा



तूजवर कृपा सा-या ऋतू अन असमंताची
तुला साथ आहे समस्त जनतेची
अवलंबू नकोस कुणाच्या आश्वासनावर
कपाळी नव्हे, ठेव विश्वास स्वकष्टावर
तुच अन्नदाता नको घेवू कुणाचे अनुदान
घेवून चोरांचे कर्ज शेत ठेवू नको गहाण
तुझ्या आत्महत्येच्या वार्तेने मन खीन्नं आहे
तुझे कुटुंब बघून पापण्या ओल्या, डोकं सुन्न आहे
छोट्या मोठ्या अपयशाने करून घेवू नको अवकळा
तू घेवून गळफास नको आवळू कुटूंबाचा गळा.

संतोष राजारामजी झुंजारे
अकोला
मो :९४२१७७३३५८

## आरसा-दृष्टी



आरशात लांबचे पदार्थ दुरीपेक्षा जवळ दिसतात
अविचाराने घेतलेले निर्णय फोल ठरतात. ।। १ ।।
यान आकाशाकडे जाताना करते पृथ्वीवर धूरा,
आकाशात जाऊन पृथ्वीभोवती मारते चकरा.
पृथ्वीवरून आकाशात जातावा त्याने केला सुटकारा
त्याचा नंतर पृथ्वीवर पडतो पसारा ।। २ ।।
साधा वर बांधून पोटाची नाही भरत खळी
पृथ्वीवर जागा असताना उंच आणि भूमिगत
घरे बांधून आम्ही होतो भुकंपाचे बळी ।। ३ ।।
जपान आकारने लहान परंतू विचाराने, प्रगतीने महान
आम्ही आकाराने महान करतो, भूमिगत उपकेंद्र बांधण्याचे अवधान ।। ४ ।।
आधुनिकतेत छोटे छोटे होतात मौल्यवान
कर्जामुळे अलिशानाचे निघते दिवाळे
जसे महापूरे वृक्ष जाती तेथे लव्हाळे उरती ।। ५ ।।
विजनिर्मिती आणि भार याने फ्रेक्वेंशी बेजार
कोळशामुळे आहे विजनिर्मिती हैराण
कोळशाकरिता जमिनीला नाही पोकरणार
सौर उर्जेने भार सांभाळून फ्रेक्वेंशी स्थिरवणार ।। ६ ।।
आम्ही सूर्याचा पूर्ण फायदा घेऊ
जनजागृती करून घरोघरी सौर उपकरण बसवू
आदर्श महापारेषणचा संकल्प करू ।। ७ ।।

**श्रीराम सपकाळ**
(अधिक्षक अभियंता)
रा. भा. प्रे. केंद्र, एरोली नवी, मुंबई

## महामानव असे होवुन गेले



सामान्य माणसामध्ये
असामान्य मानव होवून गेले.
मानवाला माणसशास्त्र समजण्याची,
शिकवण देवून गेले.
अंधाऱ्या वाटेत प्रकाशाची एक दिशा, किरण नव्हे तर,
संपूर्ण सुर्यच आपल्या वाटेला देवून गेले.
बुद्ध, कबिर, भिमराव, फुले हे नाव उजळुन गेले.
शिक्षणाची नव्हती एकही दिशा
शिक्षणाच्या चारही दिशा उघड्या करून गेले.
मानवावर नाही तर, पशु-प्राण्यावरही प्रेम करण्याची,
शिकवण देवून गेले.
देवसमान कार्य ते करून गेले.
शिवराय, पंडित नेहरू, गांधी, सुभाष
आपल्या प्राणांची पर्वा न करता
भारत देशासाठी, ते लढुन गेले.
आपल्याला सोडून गेले तरी ते, स्वत: अमर होवुनी गेले.
त्यांचेच नांव महामानव असे होवुनी गेले.

**अशोक दादाराव कांबळे**
ज्युनियर टेक्निशियन,
४०० के.व्ही. ग्रहण केंद्र,
लांबोटी, सोलापूर

## वेडा तो कावळा



एक एक काडीने
बनवीतो घरटे
वेडा तो कावळा
मानवा, रंग तुझा रे आगळा
तु चिंतेचं ओझ, घेवून शिरी
का दावितो, आपुलीच हुशारी ?
बघ मार्ग दावितो, तो सावळा
मानवा, रंग तुझा रे आगळा
तुफानांस तो करून क्षमा
झोकुन देतो, नित्य कामा
जिवन मानुनी, सुवर्ण सोहळा
मानवा, रंग तुझा रे आगळा



पंख फुटता, उडती पिल्ले
हसत त्याने, सत्य स्विकारले
तुच का वागतोस पांगळा
मानवा, रंग तुझा रे आगळा
आले गेले, लाख पक्षी
ना रूकली त्याची, गोड नक्षी
म्हणुनीच कोकीळेचा, आहे गोड गळा
मानवा, रंग तुझा रे आगळा

**महेंद्र सदाशिव वाकळे**
उपकार्यकारी अभियंता,
महापारेषण, मुंबई

## निरोप



निरोप मी आपणास देतो
करूनी आठवणींचा उजाळा ।। १ ।।
सदैव केलेत कार्य तत्परतेने
कधी न केला तुम्ही कंटाळा ।। २ ।।
कर्म केले नेहमी साधना मानूनी
कुणासवे न वागले भावना दु:खवूनी ।। ३ ।।
राहुन सदैव सद्भावांनी
उज्वल आठवणी मागे ठेवूनी ।।४।।
जीवन संसारात उत्कृष्ट वागूनी
जबाबदारीस वाहीले सर्व त्यागूनी ।।५।।
सहकार्यासवे नित्य राहीले प्रेमाने
कुणासवे न वागले दुजाभावाने ।। ६ ।।
सद्वर्तनुकीने राहीले सर्वांच्यात
असाल तुम्ही निरंतर साऱ्यांच्या मनात ।। ७ ।।
ठेवूनी मागे असंख्य आठवणी
चालला आज निवृत्त होऊनी ।। ८ ।।
आम्हा पथदर्शक ठरेल तुमची कर्म कहाणी
नेहमी वंदन आमचे तुम्हालागोनी ।। ९ ।।
आमचा निरोप आज स्वीकारूनी
असाल तुम्ही आमच्यात सन्मानानी ।। १० ।।
जावो भावी आयुष्य सुख-समाधानी
हिच माझी प्रार्थना ईश्वरचरणी ।। ११ ।।

**हरिश्चंद्र मुरलीधर जोशी**
क. तंत्रज्ञ
१३२ के. व्ही. उप केंद्र,
गौरक्षण रोड, अकोला

## आवाहन

नमस्कार वाचकहो,

पुढील अंकासाठी परिमंडळात झालेल्या महत्त्वाच्या घडामोडी, कंपनीतील कर्मचाऱ्यांनी अथवा त्यांच्या पाल्यांनी मिळविलेले यश आदी बातम्या सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजूरीने "महापारेषण समाचारच्या" पत्त्यावर पाठवाव्यात.

## "वसुंधरेचं ऋण"

"जल जंगल जमीन" संवर्धनासाठी जगभर होणारे प्रयत्न स्तुत्य असले तरी आपल्या देशात या विषयी किती प्रामाणिक प्रयत्न होत आहेत या बद्दल शंका आहे. सरकारी पातळीवर होणाऱ्या प्रयत्नाना सर्वसाधारण जनता किती प्रतिसाद देते हेही महत्वाचे आहे. गेल्या काही दिवसात महाराष्ट्र सरकारनेही विशेषत: मुख्य सचिव मा. रत्नाकर गायकवाड साहेबांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करत असल्याचे चित्र दिसते. येत्या पाच वर्षात ५०० कोटी झाडे लावण्याचे धोरण असल्याचे कळते व त्याला रोजगार हमी योजनेची जोड देण्यात येणार हेही समजते. महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अतिशय स्तुत्य असे हे धोरण आहे. ग्लोब वार्मिंग बद्दल जगभर जागरूकता अभियान चालूच आहेत. कोठे ज्वालामुखी, कोठे महापूर, त्सुनामी, भुकंप सुरूच आहेत याचा अर्थ मानव निसर्गावर अन्याय करीत आहे. आपल्याकडे तापमान ५० सेंग्रे झाल्याचे दिसते हि सर्वांसाठी धोक्याची घंटा आहे. याचा अर्थ १०० से.ग्रे. ला पाणी उकळतं म्हणजे आपण ५० टक्के विनाशाच्या मार्गावर आहोत. ५० से. ग्रे. उन्हात उडणारे पशु-पक्षी हमखास मरतात व मनुष्यसुद्धा उष्माघाताचा बळी ठरत आहे.

यावर काही उपाय प्रत्येकांनी आपापल्या परिने विचार केल्यास हमखास मिळेल. आपण आजपर्यंत धरतीकडून फक्त घेण्याचं काम केलं आहे. परंतु त्याच्या संवर्धनासाठी काही केल्याचं आढळत नाही. (मोहन धारीया वगैरे सन्माननीय अपवाद आहेत) आपण ज्या ऑरगनाइजेशन मध्ये काम करतो त्याचं काम जरी विज पुरवठा करणे असेल तरी त्यासाठी आपल्या कंपन्यान कडून बरीच वृक्षतोड केली जाते. निर्मिती कं. भरमसाठ प्रदुषण केल्यानंतरच वीज निर्मिती करते वितरण कं. ट्री कटींग नियमित करीत असते व आपल्या पारेषण कंपनीला राज्यात पारेषणाचे जाळे विणताना जंगल, डोंगर कपारीतून, सुपीक जमिनीवरून अनेक कि. मी. जमीन व्यापताना मार्गात येणाऱ्या वृक्षांची तोड करणे जरूरीचे असते. वीज अत्यावश्यक आहे व वीजेवरच लहान मोठे उद्योगधंदे, शेती चालत असल्यामुळे हे सगळं थांबविणे जरी शक्य नसले तरी आपण याची काही प्रमाणात भरपाई करू शकतो का? याचा विचार सगळयांनी केला पाहिजे. कोण काय करेल यापेक्षा आपल्या तिन्ही कंपन्याच्या कर्मचाऱ्यांनी मनात आणलं तर "वसुंधरेचं ऋण" निदान पारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी तरी काहीप्रमाणात फेडण्याची तयारी ठेवली पाहीजे. निवृत्त होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांनी आपल्या ग्रॅच्युटीच्या अर्धा टक्का किंवा शेवटच्या पगाराच्या ५ टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल ती "वसुंधरेचं ऋण फंडात "जमा करून आपल्या पुढील पिढीसमोर आदर्श ठेवावा. माझी तर सहमती आहे आपल्या सर्वांच्या सहमतीची अपेक्षा आहे. देशभराच्या कर्मचाऱ्यांसाठी आपण एक आदर्श निर्माण करू या, व जन्म घेतल्यापासून मरेपर्यंत जो श्वास घेतला त्याची परतफेड करण्यात खारीचा वाटा उचलु या!

**वामन पो. राठोड**
व्यवस्थापक ( वि. व. ले)
अ. उ. दा. बां. नि.सु. मंडळ, एरोली

# आठवणीचा सोहळा

परवा मैत्रीण म्हणाली "चल आपण साडयांच्या खरेदीला जाऊ." "मी म्हणाले अग गर्दी किती असते संध्याकाळी, ह्या दिवसांत निवांतपणा कसा मिळेल खरेदीला ? त्यापेक्षा आपण त्यानंतर जाऊयाना", त्यावर ती म्हणाली त्यानंतर पितृपक्ष लागतो. अग त्या दिवसांत काहीही शुभ काम करत नाही.

मी विचार करत राहिले. पितृपक्ष म्हणजे पितरांच्या तर्पणाचा पंधरवडा. पितरांच्या स्मरणाचा पंधरवडा. मग त्यात अशुभ ते काय? पितरांच्या आठवणींसाठी हे वर्षातले पंधरा दिवस ऋषींनी आपल्याला स्मरण करून दिलयं की पितरांचही स्मरण करा. आपल्या संसारात, देण्याघेण्यांत, हौसीमौजीत, आपण त्यांना विसरतो. ते होते म्हणून आपण आज आहोत. पणजोबा होते म्हणून आजोबा, अन् आजोबा होते म्हणून वडील, अन् वडील होते म्हणून आपण आहोत. रक्ताच पाणी करून त्यांनी आपल्याला वाढवलं. सुख , सोयी नसतांनाही काबाडकष्ट करून आपण सुखांत रहावे म्हणून वाटेल ते हाल अपेष्टा सोसल्या. माझ्या अस्तित्वाचे ते जनक आहेत, स्वामी आहेत. त्यांनी दिलेल्या आदर्शामुळे मी घडलो त्यांचे आदर्शांचं जतंन मला करायंच आहे. तेच आदर्श मला पुढच्या पिढीला द्यायचे आहेत. म्हणून त्यांचे स्मरण, त्यांची कृतज्ञता ही माझ्या जीवनातली आद्य इतिकर्तव्यता आहे. त्यांना विसरून कधीच चालणांर नाही. म्हणून हा पंधरवडा केवळ त्यांच्या स्मरणासाठी. मग ह्या पंधरवडयात सर्व तिथी बंद. लग्न वास्तुशांती, मुंज, साखरपुडा, नारळ रुपया, सुपारी, लग्नाची बोलणी, कुठलीही खरेदी, शुभकार्य त्यासंबंधी बोलणी, सगळं बंद. कारण हे पंधरा दिवस मी पितरांच्या आठवणींच्या सानिध्यात घालवणार आहे.

आजकाल वेळेनुसार धकाधकीच्या जीवनांत सर्व तिथींची बंधन शिथील होत चालली आहेत. कुठलीही तिथी ब्राह्मण काढून देतांत. पण ह्या पंधरवडयाला धक्का लावण्याचे साहस अजुन धर्मानें केले नाही. केवळ धर्माचीच भीती माणुस पाळतो हे मात्र नक्की. म्हणून काही करायचे नाही हे भाकीत धर्माकडून करावे लागले. शुभ काम करू नये हा संकेत टाकल्याने माझं काही अशुभ होईल या भीतीने तरी माणुस ह्या पंधरवडयाला पाळतो. आणि भावनिकतेचे जतन आपो आप होते.

पण ह्यां पंधरवडयासारखे पवित्र शुभ दिवस माझ्यामते दुसरे नाहीत. ह्या पंधरवडयांत मरंण आलं तर स्वर्गाची दारे देखील उघडी राहतात. असा समज आहे तर मग हे दिवस अशुभ कसे असतील? पूर्वी ह्या पंधरवडयांत कोण धामधुम असायची.

माझे आजोबा तर ह्या पंधरा दिवसांत एकच दिवस घरी जेवायला असत. ज्या दिवशी आमच्या घरी पितर जेवायचे असत तेव्हा, मग दररोज त्यांना आमंत्रण असे. दररोज कुणी ना कुणी सकाळीच ओसरीवर आलेला असायचं. मग त्यांना गूळपाणी घेऊन जायच कामं माझंच असायचं. त्यांच गूळपाणी देवून झालं तरी मी तेथे रेंगाळायची. त्यांनी आणलेले तांदूळ ते आजोबांच्या हातांवर ठेवायचे. अन् तुम्ही आमचे पितर बनून आमचे घरी या. आम्हाला कृतार्थ करां. अशी विनवणी ते हात जोडून करायचे.

कुणाला तरी आपल्या वडीलांच्या रूपांत पाहून आपले वडील प्रत्यक्ष काहीवेळ आपल्या समोर असून त्यांच्या छत्रछायेत आपण असल्याचा आभास बाळगून त्यांच्या आर्शीवादाला आम्ही पारखे होऊ नये. त्यांची सेवा आजही घडावी हा केवढा मनाला दिलासा देणारा उदात्त हेतू आमच्या संस्कृतीने आम्हाला दिला. हा पंधरवडा मृत्युवरही मात करून पितरांचे सानिध्य आम्हाला देतो. म्हणून ह्या पंधरवडयाचे महत्व वेगळे आहे. त्यातला भाव वेगळा आहे. त्या भावामागच समाधान वेगळं आहे.

पूर्वी आमच्या घरी हा सोहळा खूप मोठया प्रमाणांत असायचा. सकाळपासून घरांतल्या सगळया बायका स्वयंपाकाला भिडलेल्या असायच्या. आजोबा सकाळीच ओसरीबाहेर अग्नी प्रदीप्त करून त्यात तुपाचे हवन करून सूर्यदेवतेला मनोमन आवाहन करायचे. हे पितरांनो तुमच्या आगमनाची मी प्रतिक्षा करत आहे. आज येऊन मला धन्य करावे. असे मनोभावे म्हणत.

दुपारी अकरा नंतर सर्व जेष्ठ मंडळीचे आगमन होई. त्यांना बाहेर घंगाळात हात पाय धुवायला पाणी ठेवले जाई. पुसायला पंचा दिला जाई. दोन दिवस आधी सर्व घर परसदार आईन शेणाने स्वच्छ सारवलेले असे. बाहेर सुरेख रांगोळी असे.

घरात जेवणाच्या प्रत्येक आसनासमोर पाट मांडलेला असे. अन्न परब्रह्म म्हणून त्याला दिलेला तो मान असे. आपल्यापेक्षा अन्नाचा स्तर उंचावरच हवा म्हणून पाटावर जेवण मांडून त्यावर केळीच्या पानाची व्यवस्था असे. पाटाभोवती सुरेख रांगोळी रेखलेली असे. डावीकडे चंदनी अगरबत्यांचा घमघमाट सुटलेला असे. उदवत्यांचा अन तळणाचा घमघमाट सगळीकडे पसरलेला असे. आम्हाला भूक रहावत नसे. पण फक्त पाच वर्षाच्या आतल्या मुलांनाच नैवेद्याच्या आधी जेवण्याची सवलत आजी देई.

सगळी ताट भरून हळदी कुंकु वाहून लहानथोरांपासून सगळे दर्शन घेत व ते ताट आजोबा माळवदावर म्हणजे घराच्या वर मातीच्या खडवानाची गच्ची असे त्यावर नेऊन ठेवत. आमच्या घरी भलेमोठे कवठाचे झाड होते. त्यावर सकाळपासून कावळयांची कांव कांव चालु असे. आजोबा त्यांच्याशी आत्मीयतेने बोलत. "थांबा अजून थोडा वेळ आहे, होतंच आलंय." वगैरे वगैरे.

पण जेव्हा आजोबा प्रत्यक्ष नैवेद्य नेऊन ठेवत. तेव्हा मात्र कावळे आजुबाजुच्या घरांच्या झाडांवर दिसंत. तेथून ते इकडे पहात असंत. पण येत मात्र नसत. मग आजोबा वेगळया वाटीत दही भात कालवून थोडा थोडा सगळया दिशने टाकत, कांव कांव असे ओरडत. जणू ते त्यांच्यात मिसळून जात. मग कळकळीने ते विनवणी करत.

"कधी तुमच्या आज्ञेबाहेर गेलो नाही. कधीही तुमचा शब्द ओलांडला नाही. तुमच्या सेवेत कधी कसूर होऊ दिली नाही. तुमच्या डोळयाच्या दापात आयुष्यभर वावरलो. तरीही आमचेकडून काही कसूर झाली असेल तर मोठया मनानं क्षमा करावी. आम्ही बालके तुमच्याविना पोरके झालो. नाही झेपवंत. जमेल तस पार पाडतो. तुम्ही काही क्षणांसाठी या. आम्हाला तेवढांच दिलासा.

आजोबांचे शेजारी उभी राहून कानात प्राण आणून मी हे सारं ऐकायची. बाकी खाली सगळया मंडळीची आपसांत चर्चा चालायची. "आजच त्यांचा मान! मान घेतीलच का नाही घेणार."

पण आजोबांच्या विनवणीनंतर मात्र एक कावळा हळूच इकडे तिकडे पहात यायचा. अन् मग त्यांने कांव-कांव केल्यावर बाकी सगळे कावळे भराभर जमा व्हायचे. त्याने एक घांस उचलला की बाकी सगळे तुटून पडायचे. आजोबाच्या पापण्यांच्या कडा ओल्या व्हायच्या. धोतराच्या सोंग्याने ते डोळे पुसायचे. अन् घेतला, घेतला म्हणून सगळे आनंदित व्हायचे आजोबा चंदनाचा गंध सगळयांच्या कपाळी लावायचे पाया पडायचे, जवळ जवळ पन्नासेक माणसं. जेवायला असायची. मुख्य पितर मात्र वेगळे असायचे.

खरंतर हे सगळ करण्यामागे किती श्रद्धा होती. भाव होता. आज हे सगळ लयाला चाललंय. कुणालाही बोलवायला वेळ नसतो. बोलावणाराही नसतो. येणाऱ्यालाही वेळ नसतो. मग गाईला पान देऊन विधी पूर्ण झाल्याचे समजले जाते. पण गाई देखील जवळपास नाहीत. मग फक्त देवाजवळ नैवेद्य ठेवला जातो तरूण मंडळींना हे सगळं करायला वेळ नाही म्हणून जेष्ठ मंडळीनाही त्यांना समजून घेण भाग पडत. आपल्याला वेळ नाही. मग कावळयांनाही वेळं नाही. त्यांनी देखील आता घराघरावरच्या झाडांवरच ओरंडण सोडून दिलंय. मुख्य म्हणजे आता त्यांच्यासाठी झाडंदेखील कुठे आहेत?

आपणं शुभ काम करायची नाही ही फोलपटं घेतली पण त्यातलं सत्व, त्यातला भाव, त्यातली प्रांजलता, कृतज्ञता सारं सारं विसरून एक कर्मकांड म्हणून त्याचेकडे पहात आहोत. संस्कृतीची ही पिछेहाट आजच्या वृद्ध मंडळींना पहावत नाही. पण आपण मात्र आपल्या लहानपणी घेतलेल्या ह्या सोहळयाचा आनंद आपल्या नातवांना देता येत नाही ही खंत मनात घेऊनच जगत राहतो. अन् ह्या सोहळयाच्या आनंदाच्या आठवणींतच राहू पाहतो. हा भावमिश्रीत सोहळा फक्त आठवणींतच साठवत.

**शारदा गायकवाड**
लिपीक
अ.उ.दा. बां. नि. संवसु, नाशिक

## दैव दुर्विलास

श्रावण महिन्याचा तिसरा दिवस होता. दुपारी अडीच वाजेची वेळ होती बाहेर बारीक बारीक श्रावण सरी कोसळत होत्या मध्येच उन सावलीचा निसर्गाचा खेळ सुरू होता. कार्यालयीन कामातून थोडी उसंत मिळाली होती. मनात विचारचक्र सुरू होते. विचारचक्र एक अभागी मातेच्या भोवती सुरू होते. सहज कांही तरी सुचेल म्हणुन लेखणी व कागद समोर घेतला. आई थोर तुझे उपकार म्हणून तिच्या साठी कांही तरी.

अचानक, पंचाहत्तर वर्षाच्या राधाबाई, करारी बाणा, कडक वाणी नऊवारी नेसलेल्या परंतु प्रेमळ स्वभाव असलेल्या. अश्या, मन चक्षु समोर उभ्या राहिल्या त्यांचा जीवनपट हळु हळु माझ्या समोर आला विधवा राधाबाईना दोन मुले, दोन मुली त्यातील एक मतिमंद होती. जुनी सातवी पास, संगित विषय घेतलेल्या राधाबाईना २ बहिणी ३ भाऊ ह्या सर्वात मोठ्या होत्या, वडिलांचा सोनारी कामाचा कारागीरीचा व्यवसाय होता पण ताठर स्वभावामुळे गिऱ्हाईक दुर्मिळच होते. घरात अठरा विश्‍व दारिद्र त्यात सट्ट्याचा नाद, त्यामुळे नातेवाईक पण मदतीला येत नसत. अश्यातच पहिली पत्नी मेलेली पण एक मुलगा असलेले स्थळ राधाबाईंना सांगुन आले परंतु व्यापारी मुलगा मिळाल्याने वडिलांनी मुलीची समजून काढून तिचे लग्न केले.दोघांच्या वयात फरकही बराच होता पण त्याकाळी बोलण्याची (बापासमोर) हिंमत नसल्याने राधाबाई व्यापारी बाई झाल्या शिवाय सावत्र मुलगा, हळु हळु संसार फुलु लागला. रडत कुढत कां असेना पण जीवनचक्र सुरू होते. त्यात मुले झाल्याने त्यात मन रमवून जगणे सुरू होते. त्यातच एक मुलगी मतिमंद्र असल्याने समाजातील, शेजाऱ्यांची, नातेवाईकांची, बोलणी आलीच, संसार गाडा सुरू होता मोठ्या मुलाचे लग्न पार पडले, राधाबाईची चुल सुटली, पण अचानक पतिचे निधन झाले त्यामुळे राधाबाई खचुन गेल्या.

मतिमंद मुलीमुळे प्रत्येक ठिकाणी माधार ही ठरलेली होती सुनेला मुले झाल्याने तिच्या सोबत कामात मदत पण करत होत्या पण स्त्री म्हटले कि हेवेदावे टोचुन बोलणे, माहेरचा उद्धार करणे, ह्या गोष्टी दोघांनी सुरू केल्या होत्या. म्हणतात ना "तरनेको लिनता डुबनेको अभिमान". हातात व्यवहार नाही, सोबत पति नांही, चुल तर अगोदरच सुनेला दिलेली, त्यामुळे त्यांना त्याचा स्वभाव बदलणे गरजेचे होते. "सुखी रहा तु मुला माझा जीव तुझ्यात गुंतला" असे त्यांचे झाले होते.

मुलाची अवस्था त्यांचे पेक्षा भयाण होती. मतिमंद बहिण व आई, भाऊ, बहिण एकीकडे, दुसरी कडे पत्नीमुळे त्यांचे भविष्य, अस्थायी नोकरी यांची सांगड घातला घालता तो पार मेता कुटीला यायचा. वडिलांचे क्षत्र नसलेला प्रेमाने कोणाच्या खाद्यांवर डोके ठेवून मन मोकळे करता येईना, घुसमट ही जीवनाच्या पाचवीला पुजलेली होती.

राधाबाईचा मुलांसाठी जीव तुटत होता, तिच्या परिने तिने हिंमत करून मुलांना मार्गदर्शन करून जीवन कंठणे सुरू होते. अचानक मतिमंद मुलीचे निधन झाले. राधाबाईना तिचा फार आधार होता. एकाकी जगणे, नशिबी आले. दोन्ही मुले तिची काळजी घेत होते. पण सुन सासूचे उंदरा, मांजराचे खेळ सुरू होते. थंड पाणी, गरमपाणी, यांचा मेळ साधतांना त्यांची त्रेधा तिरपीट उडत होती. त्यातच आजारपण, म्हातारपण व दोन पिढींचे अंतर कमी करता येत नव्हते ते वाढतच होते. त्यांची दोन मुले ही त्यांची मोठी संपत्ती होती एक श्रावण बाळ एक चिल्याबाळ ही दोन डोळे रूपी द्वारपाल, त्या वयस्कर धडरूपी घराची रखवाली करत होते. मातेच्या दुधाचे पांग पोरांनी फेडलेच पाहिजेत. ते त्यांचे कर्तव्य असुन जो ते करत नाही तो स्वत:च्या नजरेत कमजोर पडतो. दुसऱ्याच्या नजरेतुन उतरलेल्या माणसाला सावरता येते पण स्वतत्व हरवलेल्या माणसाचा ऱ्हास हा ठरलेला असतो. हे सुर्य प्रकाशा एवढेच सत्य आहे. राधाबाई, त्यांचे दुर्देव, सुख, विलास हे सर्व दुर्दैविलास झाले होते. ओघा ओघात बराच वेळ कधी गेला कळले नाही.

अचानक बाहेरून हाक आली विचारचक्र संपले विषय कधीच संपत नाही. पुन्हा केंव्हातरी लिहणे भाग पडल्यास पुढील प्रवास होईलच सद्या तरी विश्रांती.

**दत्तात्रय विठ्ठल सोनार**
कारागीर - "अ"
१३२ के. व्ही. उपकेंद्र, कोपरगांव, जि. नगर-कोपरगांव

# जीवन



आकाशाच्या सरोवरात पृथ्वीचे हे विराट कमलपुष्प उमललेले आहे आणि तो भ्रमर चंद्र आपले रूपेरी पंख लावून त्या कमलाभोवती अखंड गुंजारव करीत आहे त्या पाकळीवर एक सुंदर दवबिंदू पडला आहे त्याचे नाव जीवन.

जीवन ही विलक्षण अशी ईश्वराची देणगी आहे ते एकदाच प्राप्त होते. मागील जन्म, पुर्नजन्म या संकल्पना अनाकलनीय आहेत. मात्र सध्या प्राप्त झालेले जीवन हे मागील जन्मातील कर्मावर आधारीत असावे असे वाटते. भूतकाळ गेलेला असतो, भविष्यकाळ आपल्या हातात नसतो, वर्तमानकाळातील चालू क्षण फक्त आपल्या हातात असतो. जीवनात वेळेचे महत्व फार आहे. तो वेळ सत्कारणी लावणे व तरूण वयात चांगले ज्ञान संपादन करणे हे फार मोलाचे आहे. संपत्ती ही जीवनात महत्वाची आहेच त्याहीपेक्षा ज्ञान, शिक्षण हे फार महत्वाचे आहे. कारण ती भावी जीवनाची शिदोरी आहे. जीवन जगत असताना विविध अडथळे, अनंत अडचणी येत असतात म्हणून थांबायचे नसते तर कासवाच्या गतीने सतत पुढे सरकत रहायचे असते. आपल्या मनाप्रमाणे तर कधीच घडत नसते म्हणून नाराज-निराश न होता त्रागा करून न घेता अडथळयांच्या शर्यतीत झोकून द्यायचे असते. इथे प्रत्येक ठिकाणी तडजोडी कराव्या लागतात घरात, कार्यालयात अगर व्यवसायाच्या ठिकाणी किंवा सार्वजनीक जीवनात तर त्यांचा आनंदाने स्वीकार करावा. तडजोड म्हणजे अन्याय नव्हे. जीवन आनंददायी आहे मात्र सोपे नाही. आपल्या कुवतीप्रमाणे अपेक्षांचे ओझे बाळगणे जास्त संयुक्तीत ठरेल. उदात्त मोठी स्वप्ने जरूर बाळगावीत मात्र त्यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करणे जरूरीचे आहे. हळू हळू थोडक्यात स्टेप बाय स्टेप प्रगती टिकून राहते. जीवनात चाणक्य निती, तर्कशास्त्र, ईसापनीती ही देखील मार्गदर्शक ठरू शकते. ज्यांच्या गरजा कमी तो सुखी. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, दंभ या षडरिपूवर काबू ठेवण्याचा प्रयत्न करणे, सत्प्रवृत्तीवर विश्वास, धार्मिकता योगाभ्यास थोडा व्यायाम, शाकाहार या द्वारे सात्वीक लहरींचा लाभ शक्य आहे. खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी ही वृत्ती ठेवता कामा नये, जे आहे त्याचा आनंदाने स्विकार करून वाटचाल करणे हेच खरे जीवन. तसेच दुख: आणि वेदना विसरून जगणे हिच जगण्याची कला आहे.

कितीही मोठे झालात तरी आई-वडील, गुरूजन, साधुसंत यांचा योग्य तो सन्मान ठेवा. किंबहुना कोणाशीही सौजन्याने वागणे उचित ठरेल. जीवन हे क्षण भंगुर आहे म्हणून तर नियोजन योग्य करा. जीवनाचे अर्थ जो तो आप आपल्या परीने काढीत असतो. जीवन म्हणजे काय? नेमके उत्तर कठीण आहे.

जीवनात कोणतेही क्षेत्र असो त्यामध्ये प्रगती करणे, धरसोड वृत्ती उपयोगी नाही. कष्टाचे श्रमाचे मोल मोठे आहे. कोणतेही काम असो त्यात कमीपणा बाळगता कामा नये. झटपट कष्ट न करता श्रीमंतीचे स्वप्न वा वाममागाने संपत्ती कमविणे योग्य नव्हे.

जीवनात परोपकार दानधर्म, अतिथीधर्म, मानवतावाद या मूल्यांची देखील जोपासना केली पाहिजे. केवळ पैसा म्हणजे सर्वस्व नव्हे. साधी राहणी आणि उच्च विचार सरणी ही जीवनशैली केव्हाही चांगली या खेरीज, द्वेशभावना, क्रोध, अतिरेकी वृत्ती त्यावर विजय मिळविण्याचा प्रयत्न करणे. माणसाला धनाची हाव खूप, पण त्याच्या लक्षात येत नाही की आपण मरतो तेव्हा धन पृथ्वीवरच राहते. पशू गोठयात राहतात. पत्नीही घराच्या दारापर्यंतच येते. आणि सगेसोरेही स्मशानापर्यंतच येतात. एकदा देह चितेवर चढला की सारे आपापल्या मार्गाने परत फिरतात, पण आयुष्यभर हे मर्म न जाणता माणूस फक्त गोळा करीत असतो. जगजेत्या सिकंदराची ही कथा. साऱ्या जगावर मालकी हक्क प्रस्थापित करण्याची आकांक्षा धरणारा तो सिकंदर आसन्नमरण पडला होता. त्या वेळी त्याला विचारण्यात आले, हुजूर आपली अखेरची इच्छा काय आहे? त्यावर सिकंदर म्हणाला माझी तिरडी खुली ठेवा, जगाला कळू दे, सगळ मागे ठेवून सिकंदर जग सोडून गेला. मेल्यानंतर जे घेऊन जायचं ते त्यांन मिळविलंच नाही. थोडक्यात काय माणसाच्या अखेरपर्यंत सोबत करते ते प्रेम आणि माणुसकीच.

शक्य असेल तर इतरांना मदत करा. शक्य नसेल तर किमान त्रास तरी देऊ नका. जीवनात भूतकाळपासून शिका, वर्तमानात जगा आणि भविष्याबाबत आशादायी रहा.

तेंव्हा मिळालेले जीवन प्राप्त परिस्थितीत जास्तीत जास्त आनंदाने जगण्याचा प्रयत्न करणे. धर्म, अर्थ, काम व मोक्षप्राप्ती हेच जीवनाचे अंतिम ध्येय आहे.

**श्री. श्रीपाद नारायण नाटेकर**
रत्नागिरी

## मनुष्य परिस्थितीयोंका दास नही ..

सकाळी १० ची वेळ रिसोड नागपुर बसचे, प्रवाशी, 'वाट पाहिन पण एस.टी. नेच जाईन' ह्या एस.टी. महामंडळाच्या घोषवाक्याचे अनुकरण करीत प्लॅटफॉर्मवर उभे होते. नेहमीच्या सवयीप्रमाणे तब्बल १५ मिनीटे उशीराने का होईना बस प्लॅटफॉर्मवर येऊन उभी ठाकली. बस दिसता क्षणीच जो - तो आपल्या बॅग सावरत सज्ज झाला व आपल्या सवयीप्रमाणे खिडकीतुन/कुणी वर्तमानपत्र, रूमाल, बॅग हातात जे सापडेल ते सीटवर ठेवीत हक्काचे आरक्षण मिळाल्याच समाधान चेहऱ्यावर आणत, बसच्या गेट मधून 'लसण्या ताव' अंगात आणून एकमेकांना ढकलत बस मध्ये चढत होते. त्यात मी सुद्धा मेंढराप्रमाणे माझा रूमाल सीटवर फेकत एका सीट चा ताबा मिळवला. तसे बस मध्ये प्रवाशी जेम तेमच होते, त्यामुळे माझ्या बाजूची सीट रिकामीच होती.

बस, बसस्थानकाहून मार्गस्थ होणार इतक्यात एक ६० - ६५ वर्षाची व्यक्ती बस मध्ये चढली. अंगात चोळा - मोळा झालेला सदरा, पण सदरा स्वच्छ व पॅन्ट मध्ये खोचलेला होता. पायात चप्पल होती पण त्याच्या पट्ट्यामधील भाग शिवलेला होता. काळवंडलेला चेहरा, पांढऱ्या शुभ्र केसांमध्ये काळे केस, सोयाबीनच्या शेतातील तुरीच्या ओळी प्रमाणे दिसत होते. भुवयांची झालेली महिरपी कमान व पाणी खोल गेलेल्या विहीरीप्रमाणे कपाळापेक्षा बरेच आत गेलेले डोळे, भेडसावत असलेल्या चिंतेची चिन्हे दर्शवित होती. आयुष्याच्या भूतकाळातील केलेल्या कृत्याचा गहन अर्थ शोधण्यात ही व्यक्ती चिंतीत असावी असा प्राथमिक निष्कर्ष मी काढला. सीट रिकामी असल्यामुळे ती व्यक्ती माझ्या बाजुच्या सीटवर बसली. टण्-टण् असा कंडक्टरने बेलचा आवाज देताच बस हिचके देत बसस्थानकावरून मार्गस्थ झाली.

थोडा वेळ होताच माझे स्तब्ध ओठ हलले, माझी करमणूक चेतना जागृत झाली आणि मी त्या व्यक्तीला विचारले,

काय आजोबा कुठे चाललात ?

कारण प्रवासामध्ये कुठल्या गावाला जायचं ही औपचारीक बोलायची सुरूवात असते. नंतर क्रमशः पिकपाण्यापासून, नातलग, गावगप्पा ते राष्ट्रीय पातळीवर चर्चेचा उहापोह होतो.

बऱ्याच वेळाने उत्तर आले

'अमरावतीला !'

उत्तर द्यायला बराच वेळ घेतल्यामुळे पुढे बोलावे की नाही, या विचाराने मी गप्प बसण्याचे ठरवले. मग साधारण १० मिनीटांनी त्या व्यक्तीने माझी चौकशी सुरू केली, 'आपण काय करता ?'

मी क्षणात उत्तर दिले,

'मी एम.एस.ई.बी. मध्ये नोकरी करतो ! ' (व्यवहारात आजही महापारेषण, महावितरण, महानिर्मिती ऐवजी एम.एस.ई.बी. हाच शब्द रूढ आहे.)

असे म्हणताच त्या व्यक्तीचे डोळे पाणावले. त्यांचा तो रडवेला चेहरा पाहून मी गोंधळून गेलो. मी मनाशीच विचार केला, आपण तर यांना काहीच बोललो नाही, एम.एस.ई.बी. मध्ये नोकरी करतो. एवढे मोजकेच चार शब्द बोललो तर त्यांनी एकदम डोळ्यात पाणीच आणले. मी न राहून त्या व्यक्तीला विचारले, त्यांना समजूतीच्या स्वरात बोलायला लागलो.

'आजोबा ! अहो असे रडू नका !'

मी काही वाईट बोललो तर क्षमा करा, 'माझा उद्देश तुमचं मन दुखविणे इतर अजिबात नव्हता.'

खिशातून रूमाल काढून आपले डोळे पुसत ती व्यक्ती बोलायला लागली, 'माझा आणि एम.एस.ई.बी. चा म्हणजे आताच्या झालेल्या कंपनीचा खूप नजीकचा संबंध होता, मी एम.एस.ई.बी. मध्ये मोठ्या हुद्यावर होतो.' असं म्हणताच माझी आपुलकी वाढली. कारण शेवटी कंपनीचा माणुस निघाला. मी मध्येच त्यांना प्रतिप्रश्न केला.

'पण आजोबा तुमचा पेहराव, तुमचे राहणीमान हे सर्व तुमच्या भूतकाळातील पदांच्या अगदी विरूद्ध आहे' त्यावर ते म्हणाले, 'सांगतो ! सगळं सांगतो !

अधिकाराने सन्मान मिळतो पण माणूस मोठा होत नाही. माणूसकी विसरली की तुम्ही अधिकाराचा गैरवापर करायला शिकता मी सुद्धा नेमके तेच केले, माझी 'की पोस्ट' असल्यामुळे निविदा देणे, विज जोडणी देणे, पंपाचे कनेक्शन्स, कंत्राटदारांशी हातमिळवणी करीत पैसे कमविण्याचा हव्यास मला जडला होता. अंगात तारूण्याचा माज होता. कमी वयात अधिकारी पदाची सूत्रे हाती आल्यामुळे मी पैसा एके पैसा हिच उजळणी पाठ करित होतो व गिरवीत होतो. दिवसभर ऑफीस मध्ये पैश्याची जुळवा जुळव करायची व रात्री तेच पैसे पार्टीत उडवायचे. विना कष्टाची कमाई घरी कधीच जात नसते. ह्या माझ्या रोजच्या नित्यक्रमामुळे माझे घराकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले. घरी काय हवं काय नको, मुलांचा व्यासंग कसा आहे ?

अभ्यास कसा आहे ? ही गोष्टही मनाला शिवत नव्हती. घरी आलो तर बायको बडबड करायची. मी दारूच्या नशेत धुंद असल्यामुळे मी ऐकण्याच्या मन:स्थितीत राहत नव्हतो. रात्र अशीच दारूच्या मस्तीच्या नशेत गेल्यावर सकाळी उठून बायको समोर थोडी अपराधीपणाची भावना निर्माण करायची व चार समजूतीच्या गोष्टी तिलाच सांगायच्या.

'अगं, पैसा असेल तर आपण जगातील कोणतेही सुख विकत घेऊ शकतो. एकदा रिटायर्ड झालो की मग मुलांसमोर हात पसरावे लागणार नाही !

ती बिचारी भाबडी आयुष्याच्या उत्तरार्धाची स्वप्ने रंगवित मला सकाळी दारापर्यंत पोचवायला येई. परंतु तेव्हा मला हे कळलेच नाही की, मी स्वत: सह माझ्या संपूर्ण कुटूंबाला आगीच्या खाईत घेवून चाललो आहे.

एक दिवस असाच एक शेतकरी माझ्या ऑफीस मध्ये आला. त्याला शेतीसाठी पंपाची विज जोडणी पाहिजे होती. सुरूवातीला मी त्या शेतकऱ्याला नेहमीच्या स्टाईलने टरकावून लावले व सांगीतले की, जेष्ठता यादी प्रमाणे तुम्हाला जोडणी मिळेल. तुर्तास तुम्ही जा ! व दोन महिन्याने संपर्क करा. नंतर त्या शेतकऱ्याने पुन्हा दोन दिवसातच माझे ऑफीस गाठले आणि मला म्हणाला, 'साहेब तुमची काय फी आहे ती देऊ आम्ही' पण तेवढं विज जोडणीचं बघा ! असं म्हणताच माझी लालसा पेटली, त्याला सोडायचे कश्याला ? तो शेतकरी माझा काळ होता. हे मी त्यावेळी विसरलो होतो व दुसऱ्या वेळेस तो येणार होता हे माहीत असूनही मी अज्ञान होतो. कारण माझा पापाचा घडा भरला होता. ठरल्याप्रमाणे बोलणी कबुल झाली. देण्या - घेण्याचे ठरले, दिवस ठरला आणि तो काळा दिवस उजाडला. माझ्या अधोगतीची वाटचाल सुरू होणाराच तो दिवस होता.

त्या शेतकऱ्याने माझ्या हातात पैसे ठेवताच, ऑफीसच्या बाहेर शेतकरी वेषातील ॲन्टी करप्शनच्या पथकाने माझ्यावर धाड टाकली. मला रंगेहात पकडले. हातातील रक्कम, बोटांचे ठसे, हात लाल झाले. जैसे थे परिस्थितीत मला पकडले. मी पूरता गांगरून गेलो. काय करावं ते सुचेनासं झालं, डोकं गरगरायला लागले आणि क्षणार्धात चक्कर येऊन मी खाली पडलो. जेव्हा जाग आली तेव्हा मी दवाखान्यातील एका टेबलवर हातात सलाईन लावलेल्या अवस्थेत पडलेला होतो. डोक्याशेजारी माझी अर्धांगिनी बसली होती व मी शुद्धीवर केव्हा येतो याची वाट पाहत होती. सभोवती सर्व पोलीस मंडळी प्रश्नांची सरबत्ती करून माझे पार लचके तोडीत होती. नंतर अटक, जमानत, कोर्ट, पुरावे, शिक्षा या भानगडीने मी शरीराने व मनाने खूप थकलो होतो. सर्व पुरावे माझ्या विरोधात गेल्यामुळे मला नोकरी गमवावी लागली. जो फंड मिळणार होता, तो मी केव्हाचाच कर्ज काढून खर्च केला होता. त्यामुळे मी अर्थहीन झालो होतो.

इकडे मूलं व्यसनाधिन झाली होती. बापाच्या हरामाच्या पैशानं कशी ऐश करायची हे त्यांना शिकवावे लागले नाही. त्यातच नशेपाई माझा एकुलता एक मुलगा अकाली मरण पावला.यासर्व कारणांमुळे सामाजिक प्रतिष्ठा गेली, ऑफीसमध्ये कधी गेल्यास माझे सहकारी नाक मुरडू लागले. एकेकाळी अदबीने सलाम घालणारा पहारेकरीही अंगावर खेकसत होता. मधमाश्यांच्या रसहीन पोळ्यासारखी माझी अवस्था झाल्यामुळे कुणी माझ्याकडे फिरकतही नव्हता.

आत्महत्येचा विचार मनात घर करू लागला. परंतु मुलगी व माझी पत्नी यांचेकडे पाहून मी ते सुद्धा करू शकलो नाही.

आज मी एका १० बाय १२ च्या भाड्याच्या खोलीत माझं विंचवाच बिऱ्हाड घेवून राहतो आहे. जिवन चरितार्थ चालवायला बायको धूणी - भांडी करते व मुलगी एका शिवणक्लास मध्ये काम करून कशी-बशी आमच्या जिवनाचा गाडा ओढते. मी शरिराने एवढा थकल्यामुळे माझी कष्ट करण्याची मानसिकता लोप पावली आहे. केव्हा एकदा मरण जवळ करतो, हीच ईश्वराकडे प्रार्थना करित व पुर्वायुष्याची उजळणी करीत फक्त जगत आहे. तेव्हा तू बोललास म्हणुन मी रडलो नाही, तर मी माझ्या आयुष्यावर रडलो !

मी स्तब्ध होऊन त्यांची जीवन कहाणी ऐकत होतो. माझ्या डोळ्याच्या कडा ओलावल्या होत्या. एखाद्या चित्रपटाच्या कथानकाप्रमाणे त्या व्यक्तीचा जिवनपट माझ्या डोळ्यापुढे तरळत होता. त्याचा सारीपाठ ऐकण्याच्या नादात स्टॉप कधी आला कळलेच नाही. त्यांच्या कृत्याचा रागही येत होता व पश्चातापाची किव ही येत होती. विषन्नमनाने ' बरं येतो साहेब ! म्हणुन मी त्यांचा निरोप घेत बस मधुन उतरत असतांना माझे अचानक प्रवेश व्दारावर चिकटवलेल्या पत्रकाकडे लक्ष गेले. त्यावर आचार्य श्रीराम शर्मा यांचा सुविचार लिहीलेला होता.

''मनुष्य परिस्थितीयोंका दास नहिं,
वह उनका निर्माता, नियंत्रणकर्ता और स्वामी है ।''

**सचिन व्हि. सराफ**

सहाय्यक यंत्रसंचालक,

१३२ के. व्ही. उपकेंद्र, रिसोड

## कल्पकता हवीचं

म आणि न चा संयोग झाला की जे रसायन बनत ते असतं मन. जर त्याची सज्ञा करायची ठरली तर ती असेल, मजपाशी नसलेलं, मजपाशी न रुकणारं आणि कधीही माझ न एकणारं जे असतं ते म्हणजे मन. मन क्षणात इथ असतं, तर पुढल्या क्षणात ते कुठ जाईल याचा काहीही नेम नसतो. परंतु हे मन अखिल सजीव सृष्टीमध्ये फक्त मानवा जवळच आहे, नव्हे ते, मानवाला मिळालेलं सर्वोत्तमं वरदान आहे असं म्हणलं तर ते वावग ठरु नये.शेवटी मानवाचा अर्थ तरी काय... मनाचा वारसदार.

असो, मन आहे म्हणुनच मानव विचार करु लागला, तर्क बांधु लागला, संवाद साधु लागला,सुसंवाद करु लागला. तर्क वितर्क करत करत तो नाना कल्पनाही करु लागला आणि त्या कल्पना प्रत्यक्षात साकरण्याच स्वप्न मनी ठेवुन कार्य करु लागला. या त्याच्या गुणामुळचं तो पृथ्वीचा अधिपती बनला. परंतु आज तो या कल्पकतेपासुन दुर होतांना दिसत आहे. शिक्षण क्षेत्र असो का तंत्रज्ञान क्षेत्र असो तिथ या कल्पकतेला हवा तेवढा वाव मिळतांना दिसत नाही. या उलट आहे त्या मार्गावरच चालण्याचा कल सर्वत्र वाढतो आहे. याचं ढोबळ कारण असही असेल, की या मार्गावर त्याच्या प्राथमिक गरजा ( अन्न,वस्त्र, निवारा) पुर्ण होत आहेत.तस पाहीलं तर माणुस आजही स्वप्न बघतोच पण त्याच्या कक्षा जुन्याच चाकोरीत बंदिस्त आहेत. त्यांची स्वप्न फार फार काय असतांत, गडगंज पैसा,घर बंगला,मोटार गाडी, उच्च पदाची नोकरी, मुबलक सुख या पलीकडे मला नाही वाटतं कोणाचं फार काही वेगळ स्वप्न असेलं. सांगायचं तात्पर्य आज मानवी मन प्राथमीक गरजांत,चंगळवादात गुरफटलेलं आहे आणि त्याच्यातील कल्पकता हरवुन बसलं आहे.

सहाजीक मनाला प्रश्न पडला असेल की, या कल्पकतेची गरज काय ? आणि तिच्यावीना कोणता असा व्यवहार आडतोयं ? ठीक आहे मग कल्पना करा,की राईट्स बंधुंनी जर आभाळात पाखरासारख उडण्याची कल्पनाच केली नसती, आणि उडण्याचं स्वप्न मनी ठेवलं नसतं तर विमानाचा शोध लागला असता का ? आज मात्र सुपरस्वॉनिक यान अंतरळात धावतात म्हणजे काय तर आपण आहे त्याला अद्यावत करत आहोत, अधिक गतीमान होत आहोत. खरं म्हणजे कल्पकता हीच शोधाची जननी आहे, आपण मात्र गरज पडल्यावर शोधण्याची उठाठेव करतो.

भारत देश आज जगामध्ये सर्वाधिक युवा शक्ती असणारा देश आहे आणि उच्च तंत्रज्ञानातही अव्वल आहे. या शक्तीला जर कल्पकतेची शिदोरी भेटली तर मला खात्री आहे की या जगाचा चेहरा मोहरा पार बदलुन जाईलं. तसे आपणही तात्रीक क्षेत्रात कार्यरत आहोत ते म्हणजे वीजेच क्षेत्र. आज वीजेशिवाय एकही पान हालत नाही.परंतु आजही पुर्वी प्रमाणेच faraday's law of electromagnetic induction वरचं विद्युत जनित्रे चालतात. आपण यामध्ये फक्त आणि फक्त तोच अद्ध्यावतपणा आणलेला आहे.

महापारेषण मध्ये तर हजारों उत्कृष्ट अभियंते कार्यरत आहेत आणि ते या कल्पकतेच्या बळावर या वीज क्षेत्रात नक्कीच क्रांती घडवु शकतात याची मला खात्री आहे. आजचं जग झपाट्याने DIGITAL होत आहे आणि उद्याची electricity ही सुध्दा DIGITAL electricity असणार आहे. कारण शेवटी हेच खरं आहे की परीवर्तन हाच सृष्टीचा नियम आहे. जो काळानुरुप चालतो तोच इथ टिकतो. जर काळाबरोबर चालायचं असेल तर कल्पकता हवीचं.

**महेंद्र सदाशिव वाकळे**

उपकार्यकारी अभियंता, महापारेषण, मुंबई

## महिला सक्षमीकरण काळाची गरज

महिला दिन, महिला आरक्षण, महिला मंडळ ह्या महिलांसाठी असणाऱ्या सर्व गोष्टी आज वारंवार आपल्या कानावर पडत असतात. वरील सर्व गोष्टी फक्त महिलांकरीताच खास असल्याचा गवगवा होताना दिसतो.

महिला हिला सबला म्हणायची की अबला हा प्रश्न कायमच माझ्या डोक्यात भिरभिरत असतो. म्हंटल तर सबला नाहीतर अबला. अनादी अनंत काळापासून स्त्रिला आदीमाता आदीशक्ती म्हटले आहे. सांगायला अभिमान वाटतो की आज २१ व्या शतकात महिलांनी प्रत्येक क्षेत्र पादाक्रांत केले आहे. आज आपल्या भारतदेशाच्या राष्ट्रपतीपदावर एक महिला श्रीमती प्रतिभाताई पाटील विराजमान आहेत. कल्पना चावला सारखा मुली/महिलांनी अटकेपार झेंडा लावून आपल्या भारत देशाचे नांव उज्वल केले आहे. आजच्या घडीला महिला सक्षम असून पुरूषांच्या खांद्याला खांद्या लावून काम करत आहेत. त्याच प्रमाणे घरदार, मुले बाळे, शिक्षण ह्या सर्व स्तरावर महिला आघाडीवर आहेत.

परंतू त्याच महिलेला अबला म्हणून बऱ्याच अत्याचाराला बळी पडावे लागते आहे. ह्याचे प्रत्यंतर रोजचे वर्तमानपत्र वाचल्यावरच लक्षात येते. प्रत्येक दिवशी महिलेवर झालेल्या बलात्कार, अत्याचाराच्या बातम्या वाचावयास मिळतात. विज्ञान प्रगत झाल्यामुळे आजही २१ व्या शतकात मुलीचा जन्मसुद्धा काही ठिकाणी नाकारण्यात येत आहे. कारण आज प्रत्येकाला मुलगाच जन्माला यायला हवा आहे. केवढी ही विषमता !

निसर्गाने स्त्रीला नाजूक, कोमल व सुंदर बनवीले आहे. ह्याचाच फायदा घेऊन तिच्या स्त्रीत्वावर घाला घालणारे नराधम आज समाजात उजळ माथ्याने वारंवार दिसतात. त्यानी अगदी ३ महिन्याच्या बालकापासून ते म्हाताऱ्या बायकाना सुद्धा सोडलेले नाही. अशा प्रकारचे महिलेचे शोषण होताना, पाहून मला हया सर्वाची चीड येते व मन उद्वीग्न होते. वेश्या किंवा बारमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांची मजबूरी असते कारण पैशाशिवाय त्यांची घरेदारे, संसार, चालतच नाही.

समाजातील ह्या महिलाच्या शोषणामूळे मन विषण्ण होते आणि असे वाटते की स्त्रीने ह्या वरील गोष्टीला सक्षमपणे तोंड द्यावे, सर्व जोखडे दूर सारावीत व जगाला दाखवून द्यावे, की स्त्री एक सबला आहे. आजच्या या जगात तिला स्वसंरक्षण करता आलेच पहिजे उदा. तिने कराटे वैगरेचे शिक्षण घेतलेच पाहिजे. प्रसंगी दोन हात करावयाची तयारी ठेवलीच पाहीजे. कारण केवळ पुरूषांच्या खांद्यावर डोके ठेवून मुळुमुळु रडण्याचा काळ आता केव्हाच संपला आहे. अर्थाजनासाठी आज खालपासून वरच्या स्तरातील स्त्रीला घराबाहेर पडावेच लागते. आज ती तीची गरज आहे.

असे म्हणतात की स्त्री शिकली तर ती तीन पिढयांचा उद्धार करते. अशी ती आदीमाता आदिशक्ती स्त्री ही सर्व जगाचा उद्धार करेल. ती शिकून सवरून तयार झाली तर आपल्या मुलाबाळांना साक्षर बनवेल.

हळू हळू सर्व समाज सुशिक्षित होईल/साक्षर होईल. अज्ञानाचा अंधकार नाहिसा होईल, पाठोपाठ सर्वांची प्रगती होईल. त्यानंतरच महिला सक्षमीकरण होईल. सर्वजण तिच्याकडे आदराने पाहायला लागतील. तदनंतर स्त्री व पुरुष खऱ्या अर्थाने खांद्याला खांद्या लागून काम करताना दिसतील हे केवळ स्वप्न न राहता वास्तवता असेल. चला तर तुमच्या आमच्याया सारख्या स्त्रियांनी एकजूटीने कामाला लागूया.

**सौ. कस्तुरी सु. सावंत**

व्यवस्थापक (वि.ब.ले.)

म.रा. वि. पा. कं., प्रकाशगड

## "उन्नतीसाठीच हवाय, व्यक्तिमत्वविकास"



आपण देशाच्या उन्नतीमधला एक मुख्य अंग, व प्रत्येकाच्या मुलभुत गरजेपैकी एक गरज अशी ही उर्जा आणि आपण या ऊर्जाक्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करीत असतो. काम करतांना ते एकाचे नाही त्याकरिता भरपूर मणुष्यबळ लागते. व हे संपूर्ण मणुष्यबळ सर्वच एकाच विचाराचे-आचाराचे व बुद्धीमत्तेचे असणे शक्य नाही. असेच जर झाले तर ते जगातील पहीले आश्चर्य ठरेल. पण आपण ज्या क्षेत्रात काम करीत आहोत. ती आपली कर्मभूमि असुन त्यातील प्रत्येक कामगार हा आपला एक भाग आहे असे समजुन राहणे म्हणजे त्या क्षेत्राशी आपण एकरूप आहे असे समजणे होय. पण ही एक अशक्य गोष्ट आहे. ती प्रयत्नाने शक्य होऊ शकते. त्याकरीता प्रत्येकाचा "व्यक्तिमत्व" विकास होणे गरजेचे आहे. माझ्या स्वत:च्या मतानुसार व्यक्तीमत्व विकासासाठी खालील गोष्टी अमलांत आणणे जरूरीचे आहे


- कोणतेही काम करतांना आकस, डोळेझाकपणा, कामचोरवृत्ती ही टाळली पाहीजे. मी पाहीलं नव्हतं, मला माहीत नव्हत, मी ऐकलं नव्हत, मी बोललो नव्हतो ही वाक्य सरासरी टाळावीत.
- नेहमी स्पष्टपणे बोलावे, कोणाच्या पाठीमागे त्याची निंदा करू नये. थोडक्यात नेहमी स्पष्टवक्ते व्हा.
- आपण कोणाच्याही स्वप्नावर हसु नये कारण जे लोक स्वप्न पाहतात ते महत्वाकांक्षी असतात. त्यांचीच स्वप्ने खरी होतात व आपलेच हसु होतं.
- कोणतेही काम अर्धवट सोडु नका, काम अचुक व वेळेवर व सुंदर करावे, वरिष्ठांची शाबासकी हमखास मिळणार.
- दुसऱ्यांशी हळु बोला पण झटपट विचार करा, प्रत्येक परिस्थितीत स्वत:चा व इतरांचा मान ठेवा.
- वरिष्ठांच्या आज्ञेचे काटेकोरपणे पालन करा, आपल्या कार्यक्षमतेतुन व कामातुन वरिष्ठांवर छाप पाडा.
- चुकल्यास मनापासुन माफी मागा व माफ पण करा.
- नकारात्मक, संकुचित दृष्टीकोन मनात ठेवु नका.
- समोरच्या व्यक्तीला कधीही कमी लेखू नका. आजकाल कोणाची मदत कुठे होईल, कशी होईल हे आज सांगता येणार नाही. सर्वांशी संबंध चांगले व मित्रत्वाचे ठेवा आपली वाणी नेहमी शुद्ध व मधुर ठेवा.
- अपयशाची भिती मनात बाळगु नका. उलट अपयश हीच यशाची पहीली पायरी आहे.
- प्रत्येकाने स्वाभीमान बाळगावा पण अभिमान नसावा.
- कामात व जीवनात शॉर्टकट टाळा. अती घाई संकटात नेई.
- जगाच्या कल्याणासाठी आपला कसा उपयोग होईल याचा विचार करा, आपल्या चुका ओळखुन त्या दुरूस्त करा व चांगले निर्माण करा.
- नेहमी सत्य बोला कारण सत्य हे सत्यच असते.
- आपल्या मित्रांवर व सहकाऱ्यावर खरेखुरे प्रेम करा. स्नेहसंबंध जपा त्यांची काळजी घ्या. आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवा.
- नेहमी Give & Take चा विचार करा. आपल्या बोलण्याने दुसऱ्यावर काय परिणाम होईल याचा विचार करा. जसे पेराल तसेच उगवेल, चांगला विचार करा माणसाला माणसासारख वागवा.
- कुणाचाही अपमान करू नका, कुणालाही कमी लेखु नका, मोठेपण अचानक मिळत नाही किंवा विकतही मिळत नाही तर ते कमवावे लागते.
- दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकुन घ्या व आपण आवश्यक तेवढेच बोला.
- प्रत्येक कर्मचारी हा कर्तव्यदक्ष, प्रामाणिक, कार्यक्षम, दुरदृष्टीचा, पारदर्शी सकारात्मक मनोवृत्तीचा, मनमिळावु व सर्वांना बरोबर घेवून काम करणारा असावा.
- स्वत:साठी वेळ काढा, स्वत:साठीही थोड जगा व स्वत:च्या प्रकृतीची काळजी घ्या.

सामान्य माणुस हा केन्द्रबिन्दु मानावा. ग्राहक हा आपल्यावर अवलंबुन नसुन आपण त्याच्यावर अवलंबुन आहोत. तो आपल्या कामातील व्यत्यय नसुन ते आपले उद्दीष्ट आहे. त्याला सेवा पुरवुन आपण त्याच्यावर नव्हे तर सेवा पुरविण्याची संधी देवुन तो आपल्याला उपकृत करीत असतो. अशी मानसिकता प्रत्येक कामगार व अधिकारी यांची तयार होणे गरजेचे व त्यांच्याच हिताचे आहे.

ग्राहकाला उत्तम सेवा देणे हा आपला धर्म आहे, आपल्या कंपनीची उन्नती हीच आपली उन्नती आहे. सर्वांना याचा विसर पडता कामा नये. काळाप्रमाणे स्वत:ला बदलावे लागणार आहे. माणुस हा दगडासारखा आहे. त्याला मुर्तिसारखा घडवावा लागतो. दगडावर घाव घातल्याशिवाय त्याची मुर्ति बनत नाही, आणि एकदा मुर्ति बनली की लोक त्याच्या पाया पडतात. जर दगडाने घाव सहन केले नाही तर फक्त दगड नारळ फोडण्यासाठीच उपयोगी पडतो. तेव्हा आपण सर्वांनी देवपण प्राप्त करून घ्यावे. आपला कुणीतरी आदर्श घ्यावा असे वागावे व आचरण करावे. मानवी विकासात प्रशिक्षणाचे अनन्य साधारण महत्व आहे. प्रत्येक मनुष्य हा काही आभाळातुन शिकून येत नाही तर त्याला अनुभवातुन शिकता येते कामगार विषयक कायद्याचे ज्ञान फक्त पर्सनल ऑफिसरलाच असले पाहीजे असे नाही तर प्रत्येकालाच ते अवगत असणे आवश्यक आहे. आपल्या कंपनीचे हित करणे, कंपनीची प्रगती, विकास व भरभराट कशी होईल याचा विचार प्रत्येकाने केला पाहीजे कारण कंपनी जीवंत राहली तरच आपण जीवंत राहू नविन येणाऱ्या युगात नवनवी आव्हाने पेलण्याकरीता आपण सक्षम असलो पाहिजे.

**अमोल अ. इंगोले**
कनिष्ठ तंत्रज्ञ
१३२ के. व्ही. उपकेंद्र, वरूड जि. अमरावती

# कावा



बाभळ गावात सारख्या चोऱ्या व्हायच्या. त्यामुळे गावात घबराट झाली होती. गावात लवकर सामसूम होत असे. चोरांच्या भितीने लोक रातच्याला घराच्या बाहेर बी येयला घाबरत असत. आज ना उदया चोऱ्या थांबतील अस लोकांना वाटत होत. पण त्या थांबण्याऐवजी वाढतच चालल्या. त्यामुळे लोकांना काय कराव ते सुचेनास झाले. त्यामुळे चावडीत गावच्या पाटलानं, सरपंचान मिटींग बोलावली. मिटींगला गावातल्या सगळ्यांना यायला सांगितल. मिटींगला सारा गाव झाडून आला. कारण चोऱ्यांचा प्रश्न सगळ्यांनाच भेडसावत होता. मिटींग सुरू झाल्यावर सरपंचानं सांगितल की, आपल्या गावात सारख्या चोऱ्या होतात, त्यासाठी आपण काहीतरी उपाय करायला पाहिजे. अस सांगितल्यावर सगळ्यांनी माना डोलावल्या. एकजण म्हणाला उपाय काय करायचा ? त्यानंतर पाटील म्हणाले, "गावात गस्त सुरू करायची, म्हणजे गावात रातभर गस्त राहील, मग कोणीही चोर चोरी करणार नाही. पाटलाचा मुद्दा सर्वांना पसंत पडला. त्यावर एकजण म्हणाला, गस्त कशापद्धतीने सुरू करायची ? त्यास माणस कोठुन आणायची ? त्यावर मास्तर म्हणाले मी यातून मार्ग काढतो सगळेजण नीट लक्ष देऊन एका !

मास्तर सांगू लागले, आपल्या गावात चार चौक आहेत प्रत्येक चौकात पाच गडी ठेवायचे. नंतर पहिल्या चौकातल्या गड्यांनी आरोळ्या देत दुसऱ्या चौकात जायचे.नंतर दुसऱ्या चौकातल्या गड्यांनी आरोळ्या मारत तिसऱ्या चौकापर्यंत यायचे. तिसऱ्या चौकातल्या गड्यांनी आरोळ्या मारत चौथ्या चौकात जायच. चौथ्या चौकातल्या गड्यांनी आरोळी मारत पहिल्या चौकापर्यंत यायच. पहिल्या चौकातल्या गड्यांनी परत दुसऱ्या, दुसऱ्या चौकातल्यांनी परत तिसऱ्या, तिसऱ्या चौकातल्यांनी परत चौथ्या चौकात अशा पद्धतीने रातभर गस्त करायची. आणि जर कुठे चोराची चाहुल लागली तर खुणेची शिट्टी मारायची. आणि त्यावेळी चारही चौकातल्या गडयांनी एकत्र येऊन चोरावर तुटून पडायचे. मग काय टाप आहे गावात चोरी व्हायची. सगळ्यांना मास्तरांच म्हणणं पटलं. लोकांतून शब्बास मास्तर अशा आरोळ्या आल्या. पण गस्तीसाठी येवढे गडी आणायचे कुठुन ? एकजणाने शंका काढली. त्यावर पाटील व सरपंचांनी मार्ग काढला. प्रत्येक चौकात पाच प्रमाणे वीस घरामधून वीस गडी तयार ठेवायचे. त्यांनी आठवडाभर गस्त मारायची. त्याप्रमाणे दुसऱ्या वीस जणांनी तयार रहायच अस करत करत सगळ्यांची पाळी झाली की परत पहिल्यापासून सुरवात करायची. त्या बाबत मास्तर ठरवतील आणि गस्त (राऊंड) उदयापासून सुरू करायची असा गावच्या पाटलान व सरपंचान निर्णय दिला. सगळ्यांना तो पटला. लोक पाटील, सरपंच व मास्तरांनी काढलेल्या मार्गामुळे समाधानान घरी गेले.

निम्मी रात झाली. मंदिरात भजन झालं होत भजनकरी आपापल्या घरी गेली. गावात शांतता पसरली होती. दुरवर कोठेतरी कुत्री भुंकत होती. त्यांचा आवाज ऐकून बाकीची बी कत्री भुंकत होती. रातकिडयांचा किरकिर आवाज येत होता. भयाण काळोख दाटला होता. ठरल्याप्रमाण आणि मास्तरानं आखणी केल्याप्रमाण गस्तेला (राऊंडला) सुरूवात झाली अश्या प्रकारे रोज गस्त सुरू झाल्यानंतर गावातील चोऱ्या बंद झाल्या गस्तेच्या भरवशावर लोक निवांत झोपू लागले. लोकांच्या मनातील चोरांची भिती दुर झाली.

एके रात्री गस्त चालू असताना गस्तकऱ्यांच्या एका टोळीला गावातील ओढयाच्या बाजूला बॅटऱ्यांचा उजेड दिसला. काही माणसं दिसली. लगेच गस्तकऱ्यांनी खुणेच्या शिट्टया मारल्या. लगेच सर्व गस्तकरी गोळा झाले. बॅटऱ्यांच्या दिशेने ओढयाकडे गेले. ती माणसं चोरच आहेत याची खात्री झाल्यानंतर सर्वजण चोरांवर तुटुन पडले. चोरांनी लगेच पोबार केला. त्यांची पळता भुई थोडी झाली. मग काय बाभळ गावच्या गस्तकऱ्यांचा (राऊंडकऱ्यांच) उभ्या पंचक्रोशित कौतुक होऊ लागल. तालुक्याच्या फौजदाराने बी शबासकी दिली. गावच्या पाटलांचा व सरपंचांचा उर भरून आला. तसेच मास्तरांची वाहवा होऊ लागली. अशा प्रकारे रोजच्या रोज व्यवस्थीत गस्त चालू होती. चोरांबद्दल लोकांच्या मनातील भिती पळाली होती. लोक बिनधास्त रहात होते.

अशीच नेहमीप्रमाणे गस्त चालू होती. निम्मी रात होऊन रातीचा २ चा सुमार असावा. गावात १५ ते २० चोर घुसल्याची चाहुल गस्तकऱ्यांना लागली. लगेच खुणेची शिट्टी झाली. सर्व गस्तकरी गोळा झाले. चोरांवर तुटुन पडणार तोच आलेले चोर पळुन जायला लागले. तसा गस्तकऱ्यांना चांगला चेव आला. ते त्यांचा पाठलाग करू लागले. ओढयातुन, नाल्यातुन, झाडीतुन चोर पळू लागले. आणि त्यांच्या मागून गस्तकरी त्यांचा पाठलाग करू लागले. गस्तकरींना चोरांएवढे वेगात पळण्याची सवय नसल्यामुळे त्यांच्यात व चोरांत अंतर पडत चाललं. जंगल जवळ आलं आणि पुढे पळणारे चोर अचानक जंगलात गेले. आणि चोर वाटेने पसार झाले. गस्तकऱ्यांना ते कोठे गेले कळलेदेखिल नाही. गावापासून गस्तकरी चोरांच पाठलाग करत चांगल तीन ते चार कोस आले होते. चोर पळुन गेल्यामुळे ते जरा हिरमुसले. पण गावात आलेले चोर पिटाळून लावल्यामुळे त्यांना आनंदनही वाटला परत गावाकडे येताना गस्तकरी जोरजोरात गप्पा मारत येत होते. चोरांचा पाठलाग करून त्यांना पिटाळून लावलेले समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं.

"चोर सापडली नाहीत, नाहीतर त्यांना पकडूनच आणल असत" एकजण "पकडल्यानंतर चावडीत गावासमोर उभं केल असतं" - दुसरा "जाऊद्या पळवून लावल ते काय कमी केल" - तिसरा अशा गप्पा मारत गस्तकरी गावकडे येत होती वाट सरत होती आणि ते गावात आलें पाहतात तर काय ? गावात कोणाच्या डोक्यात लागलं होत, कुणाच्या पायात लागलं होत, कुणाला बांधुन ठेवल होत आणि जवळजवळ सगळ्यांच्या घरात चोऱ्या झालेल्या होत्या. कुणाचे दागिने गेले होते. कुणाची भांडीकुंडी गेली होती, कुणाचे पैसे गेलेले होते. गावात हाहाकार उडाला होता. लोक सगळे घाबरले होते. गस्तकरी हे सर्व अचंब्याने बघत होते.

गस्तकऱ्यांच्या भोवती गावातील माणसं गोळा झाली आणि म्हणाली.

"अरं मर्दानो तुम्ही गेलात. चोराच्या पाठलागावर आणि इकडे चोरांच्या दुसऱ्या टोळीने गावावर हल्ला केला. आम्ही आडवायला गेलो तर आम्हाला मारहाण केली. तुम्ही सगळं गस्तकरी पाठलागावर गेलात आणि त्यांना इकडे रान मोकळ सुटलं. चोरांनी चांगला कावा साधला.

गावातील म्हातारा आबा काठी टेकवत टेकवत आला अन् म्हणाला "अरे पोरांनो तुम्ही गस्त सुरू केली त्यामुळे चोरांना चोऱ्या करता येईना. मग चोरांनी बी कावा केला असलं त्यांनी त्यांच्या दोन टोळ्या केल्या असतील आणि ठरवल असल की, एका टोळीनं गस्तवाल्यांना झुलवत झुलवत गावांपासून लांब न्यायच आणि त्यांना हुलकावणी द्यायची. नंतर दुसऱ्यां टोळीनं गावात शिरून लुटमार करायची. अन् कोणी अडवलं तर मारहाण करायची. त्यांनी तसेच केल आणि कावा साधला अस आबांनी सांगितल्यावर सगळा गावाच्या आणि गस्तकऱ्यांच्या लक्षात आला पण यावर उपाय काय करायचा असं एकजण म्हणाला. यावर आबा म्हणाला, "पाटलाला, सरपंचाला झालेला प्रकार सांगा. लागलेल्या लोकांना औषधपाणी करा. रितसर पोलिसात फिर्याद द्या. अन् पाटलाला, सरपंचाला सांगून उपाय करण्यासाठी गावात मिटींग बोलावून चर्चा करा. अन् मास्तराच्या सल्लानं उपाय काढा. म्हाताऱ्या आबांच म्हणण सगळ्यांना पटल आणि लोक व गस्तकरी हळुहळु जाऊ लागले.

**जगन्नाथ उर्फ काकासाहेब भानुदास काळे**
म.रा. वीज मंडळ, वसाहत,
तळेगाव (दाभाडे), ता. मावळ, जि. पुणे

## ।। तिर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।।



संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज वरील अभंगात देव कुठे आहे याचे वर्णन करतात कित्येक लोकांना देव आहे, हे मान्य नाही. ते देवाल मानत नाही. देव दाखवा अशी त्यांची मागणी असते. भगवत्‌गीतेनी देव कोठे व कसा पहावा याची यादीच दहाव्या अध्यायात दिली आहे. त्यात भगवान श्रीकृष्ण म्हणतात-आकाशात पाहशील तर सूर्य, चंद्र मी आहे. पृथ्वीवर पाहशील तर हिमालय व समुद्र मी आहे. पक्षात पाहशील तर गरूड मी आहे पशूत पाहशील तर गाय मी आहे. माणसांमध्ये राजा मी आहे. संत-सज्जन तर माझेच रोकडे रूप आहे. डी.डी. व चेक ही पैशाचीच रूपे आहेत. पण रोकडा म्हणजे ताबडतोब मिळणारा आहे.

समर्थ रामदास स्वामींनी देखील "सदा संगती सज्जनाची धरावी. विवेके क्रिया आपुली पालटावी"असेच सांगितले आहे. व्यवहारीक स्तरावर किंवा रोजच्या जीवनात देखील आपल्याला सज्जन लोक हवेशे वाटतातच. उदा. दुध देणारा सज्जन असावा त्यानी दुधात पाणी मिसळू नये असे आपणास वाटते. भाजी देणाऱ्यांनी दांडी मारू नये, पेट्रोल-पंप वाल्यानी पेट्रोल बरोबर द्यावे असे आपणास वाटते. आपली मुले चांगल्या मुलांचे संगतीत राहावी असे वाटते. तात्पर्य सज्जनाची संगत नेहमी असावी असे आपणास मनोमन वाटत असते. तर हे सज्जन म्हणजे कोण ? तर जे श्रेष्ठ आहेत, ज्यांनी आपले गुणांचा उत्कर्ष केला आहे असे लोक जे आपल्या स्वत: पेक्षा श्रेष्ठ आहेत ज्यांनी आपले गुण विकसीत करून व्यक्तिमत्व विकसीत केलेले असते ते.

आपणच श्रेष्ठ आहोत, आपल्या पेक्षा श्रेष्ठ कोणी नाही असा अहंकार निर्माण झाला, तर आपली प्रगती थांबेल , आपल्या जीवनात अनेक दोष निर्माण होतील, पण आपल्या पेक्षा कोणी श्रेष्ठ आहे असे आपणास जेव्हां वाटेल तेव्हां आपण देखील त्याचे सारखे होण्याचा प्रयत्न करू, म्हणून सज्जनाची संगत असणे आवश्यक आहे. संत हे सज्जनच असतात. विनम्रपणे त्यांची सेवा केल्यास आपले अंतरात परिवर्तन होत जाते. हे परिवर्तन आपल्याला देवत्वाचे जवळ नेते. आपल्यात देखील गुणांचा उत्कर्ष होत जातो.

आध्यात्मिक प्रगती हे माणसाचे सर्वश्रेष्ठ ध्येय होय. पण ही प्रगती हळु हळु होत असते त्यासाठी व्यवहारिक स्तरावरूनच प्रयत्न करावा लागतो. प्रगतीच्या दृष्टीने श्रेष्ठतेचे दर्शन होणे अगत्याचे आहे.

घराची प्रगती व्हावी असे वाटत असेल तर घरच्या वडीलधाऱ्या मंडळींवर अधिक जबाबदारी होते. ज्ञानेश्वरीत म्हटले आहे "एथ वडील जे जे करिती, तया नाम धर्मु ठेविती. तेचि येर अनुष्ठिती। सामान्य सकळ" अर्थात घरात वडील माणसे जे जे करतात त्यालाच धर्म म्हणतात आणि त्याचेच अनुकरण घरातील लहान माणसे करतात. मुलांसमोर मोठ्यांचाच आदर्श असतो म्हणून मोठ्या मंडळींनी आपले वर्तन, चालणे, बोलणे इतरांशी वागणे इ. सारे व्यवहार कमालीचे आदर्श ठेवणे आवश्यक आहे.कारण मुलांचे दृष्टिने मोठी माणसे त्यांची आदर्श असतात तेच त्यांचे देव असतात. घर म्हणजे मंदिर समजले, तर घरातील मोठी माणसे त्या मंदिरातील देव मुर्ती होय.

जर राष्ट्राची प्रगती व्हावी असे वाटत असेल तर नेते मंडळी, मंत्री, समाज सुधारक, अधिकारी वर्ग इ. आपले वर्तन कमालीचे आदर्श ठेवणे आवश्यक आहे.

त्याच प्रमाणे आपल्या कंपनीची प्रगती व्हावी असे वाटत असेल तर पर्यवेक्षक पदापर्यंत असलेल्या सर्व अधिकारी वर्गाने आपले चालणे, बोलणे, काम करण्याची पद्धत इ. साऱ्या व्यवहारात कमालीचे आदर्श ठेवणे आवश्यक आहे कारण त्यांचे हाताखाली काम करणारा कर्मचारी वर्ग त्यांचेच अनुकरण करतो. या बाबतीत माझे उदाहरण सांगतो. मी मंडळात रूजू होण्यापुर्वी "एम्प्रेस मिल" मध्ये मोटार वाईंडिंग विभागात कार्य करत होतो तिथे आम्हाला काम शिकविणारे फोरमन हे फक्त पाऊण तासातच मोटारचे रिवाईंडिंग करत होते. कमालीची गती (Speed) त्यांनी आत्मसात केली होती. त्याच प्रमाणे एकवेळा तिथल्या विभाग अभियंत्यानी आम्हाला एकट्यानेच पुर्ण मोटार स्वत: पाने (Spanner) हातात घेवून फिट करून दाखविली होती. कमालीचे Skill त्यांनी आत्मसात केले होते. त्यामुळे कर्मचारी वर्गाचे हे दोघे ही आदर्श होते. आपल्या कंपनीत देखील असे अधिकारी, पर्यवेक्षक व कर्मचारी आहेत. असे आदर्श जितके अधिक जितकी त्या कंपनीची प्रगती अधिक.

माणूस हा श्रद्धामय आहेच त्याची कोणावर ना कोणावर तरी श्रद्धा असतेच.

म्हणजे तो कोणाला ना कोणाला तरी आदर्श ठेवतोच. हा आदर्श म्हणजे त्याचा परमात्मा किंवा देव असतो. श्रद्धा माणसाला "तद्रुप" म्हणजे त्याच्या सारखे करते सज्जनांवर श्रद्धा ठेवली तर माणूस देखील सज्जन होतो. यालाच भक्ती म्हणतात भक्त म्हणजे जो विभक्त नाही अर्थात जो त्याच्या देवापासून वेगळा नाही असा. एक रूपता किंवा तादात्म्य पावणे हे भक्तीचे स्वरूपच आहे. आपल्या जीवनात श्रेष्ठ आदर्श आपण ठेवले, नाहीत, तर आपण श्रेष्ठ बनण्याची शक्यता नाही. आपले आदर्श म्हणजे "देव" आपली ध्येय-मुर्ती आहे. आपणाला कोण बनायचे आहे ती ध्येयमुर्ती म्हणजे आपला परमात्मा होय. परमात्मा सर्वज्ञ असला तरी तो राम, कृष्ण, शिवाजी, ज्ञानदेव, विवेकानंद अशा पुर्णत्वाच्या आदर्शात पाहायला शिकणे आवश्यक आहे. परमात्मा म्हणजे पूर्णत्वाची सौंदर्यमुर्ती होय. तीच जर पूर्ण आणि सौंदर्ययुक्त नसेल तर भक्ताचे जीवन कधीही सार्थ होणार नाही.

माणूस तीर्थ क्षेत्री जातो. तिथे दगडाचा देव असतो. अशा ठिकाणी भाव असला तरच फळ मिळते पण सज्जनांचे ठिकाणी अभाविक मनुष्य असला तरी तो बदलतो. देव सज्जनांचे ठिकाणी रोकडा पाहावयास मिळतो.

ईश्वर आणि देव या संकल्पना भिन्न आहेत ईश्वर निर्गुण, निराकार आहे पण चैतन्यपूर्ण आहे अर्थात ईश्वर ही विश्वव्यापक चैतन्य, अशी संकल्पना आहे. ईश्वर हा बुद्धिगम्य आणि अनुभवास येणारा असला तरी इंद्रियगम्य नाही. ईश्वराला इंद्रियगम्य होण्यासाठी आकारात व गुणात उतरावे लागले. हे ईश्वराचे उतरणे देव संकल्पनेत येते. देव आपल्या सारखेच सगुण साकार असतात. श्री. ज्ञानदेव, शिवाजी, बिवेकानंद, संत रामदास स्वामी, संत तुकाराम ही माणसे आपणा सारखीच असतात. मग आपण यांना श्रेष्ठ का मानतो ? यांच्यात देव आहे असे का समजतो ? तर त्यांचे अंतर जीवन (व्यक्तीमत्व) अधिक विकसित झालेले असते ही व्यक्तिमत्वे संकूचित नसून, स्वत: पूरते पाहणारे नसून संपूर्ण समाज जीवनाशी, विश्वजिवनाशी अधिक तादाम्य पावलेली असतात. यांच्या सारखे स्वत: घडणे म्हणजे खरी देव पूजा होय. तसा प्रयत्न करीत राहणे म्हणजे भक्ती होय.

जितक्या प्रमाणात आपण ईश्वराच्या गुणधर्माशी एकरूप होवू, ईश्वराशी तादात्म्य पावू, तितक्या प्रमाणात आपण भक्त होवु, म्हणजे ईश्वराशी तादात्म्य पावण्याची भक्ती ही प्रवाही प्रक्रिया आहे. त्याचा प्रारंभ घरातूनच होऊ शकतो. भावनेने आपल्या लहानशा कौटुंबिक जीवनात आपण घरातील व्यक्तींशीच नव्हे, तर वस्तूजानांशी तादात्म्य पावणे ही भक्तीची पहिले पायरी आहे भक्ती म्हणजे एकात्मभाव जीवन. आम्ही एक आहोत ही भावना संपूर्ण जीवनभर असणे. इते "मी" सोडून "आम्ही" असणे महत्वाचे आहे. मी हा अहंकार आहे तर आम्ही संकुचित अहं चे व्यापक रूप आहे अहं व्यापक झाला की तो विरळ होतो व नाहीसा होतो.

आपल्या संस्कृतीने कौटुंबिक जीवनात हे भावभक्तीचे सुगंधी आणि मधुर वातावरण निर्माण करण्याचे काही सणच तयार सुगंधी आणि मधुर वातावरण निर्माण करण्याचे काही सणच तयार केले आहेत. सण शब्दशुन्य शिकवण देवून जातात. दिवाळी, रक्षाबंधन मकरसंक्रांत, रंगपंचमी, कोजागिरी ई. सणांनी आपण एकात्म भाव जीवनाचा मधूर अनुभव घेत असतो.

कौटुंबिक जीवन जगताना अनेक छोटया छोट्या गोष्टी भावजीवन निर्माण करतात आणि आपण सारे एक आहोत यांची अनुभूती देतात. ज्यावेळी कुटुंबात सारे एक असतात त्यावेळी कोणत्याही संकटावर सहज मात करता येते. दु:ख हे दु:ख राहत नाही. एकात्म भाव जीवन आपल्याला कुटुंबात दिसते. सर्व जण रात्री एकदम जेवायल बसणे, डॉक्टरानी एखाद्याला पथ्य सांगितल्यास सर्वांनीच ते पाळणे, पती-पत्नी एकमेकांसाठी त्याग करतांना दिसणे, या सर्व गोष्टींचे संस्कार लहान मुलांवर आपोआप होतात.

कौटुंबिक जीवनाप्रमाणे सामाजिक किंवा राष्ट्र जीवनाला एकात्म भावजीवनाचा स्पर्श होणे अगत्याचे आहे, परंतू सध्याचे सामाजिक वातावरण कमालीचे भ्रष्ट झाले आहे. याचे कारण म्हणजे प्रत्येक व्यक्ती स्वयंकेंद्रित झाली आहे. स्वत:चे पलीकडे इतरांकडे लक्ष द्यायल त्याला वेळ व इच्छा देखील नाही. ईश्वर हा सर्वव्यापी आहे त्यात सर्वांचा विचार अपेक्षित आहे. प्राणी, फुलं, झाडे इ. सर्वांचा विचार आपले जीवन चांगले व्हावे या साठी आवश्यक आहे. पृथ्वीवरील सर्व प्राणी नाहिसे झाले तर मनुष्य देखील जीवंत राहू शकणार नाही असे एका शास्त्रज्ञाने म्हटले. स्वत:चाच फक्त विचार करून आपण ईश्वरसंकल्पना पार पुसून टाकली आहे. ईश्वराला विसरताच मायेचे अधिराज्य सुरू होते असे वेदांत सांगतो आणि माया ही अज्ञान आणि दु:ख या शिवाय काही देऊ शकत नाही म्हणून ईश्वराला नुसते बुद्धिने मानने किंवा एखाद्या संप्रदायानी सांगितल्या प्रमाणे पूजा विधी करीत बसणे ही खरी ईश्वर निष्ठाच नाही. ईश्वर निष्ठा जीवनाचा अंश मागते, जीवनाचे समर्पण मागते, अहंकाराची आहुती अपेक्षिते.

या साठी समाजातील श्रेष्ठ देव जीवनाचे आदर्श लोकमानसासमोर अखंड राहतील याची काळजी घ्यावी लागते ही काळजी मंत्री, सरकारी अधिकारी, कीर्तनकार प्रवचनकार सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, कलावंत, शिक्षक इ. सर्वांनीच घ्यायची असते. समाज अध: पतित होऊ नये म्हणुन "देव रोकडा सज्जनी" ही श्रद्धा रूजविणे अगत्याचे असते. भारतीय संस्कृतीने पूर्वी पासूनच राम व कृष्ण यांना ईश्वराचे पूर्णावतार म्हणून स्वीकारले आहे. एका बाजूने हे ऐतिहासिक पुरूष आहेत व दूसऱ्या बाजूने पुर्णत्वाचे आदर्श आहेत. ते पृथ्वीवरील ईश्वराचे अवतार आहेत.

समाजमानसात राम व कृष्ण यांच्या सारख्या पुर्णत्वाच्या देवमूर्तींची स्थापना करणे हे फार मोठे राष्ट्रकार्य असते व्यक्तिचा आत्मविकास किंबहुना राष्ट्राचा आत्मविकास हा या देवमूर्तीवरील भक्तीने घडत असतो. म्हणून कौटुंबिक जीवनात व समाज जीवनात ईश्वराच्या खऱ्या अवतारांची स्थापना केली की समाजजीवन आपोआप प्रगतीची वाटचाल करू लागतो.

या साठी विश्वातील विविध विभूतींचा विनम्रपणे स्वीकार केला, संत सज्जनांची संगत धरली, त्यांनी सांगितलेला मार्ग निवडला तर खऱ्या ईश्वाराचे व आपले भक्त आणि भगवंत हे नाते दृढ होते.

**सुभाष र. देशपांडे**
एस. ओ.
१३२ के व्ही. बेसा उपकेंद्र,
(का. अ. विज ग्रहण केंद्र विभाग, नागपूर)

## Effective Manpower Utilisation is the need of an hour

Ours is Government organization and follows highest standard of ethical norms. Unlike private sector where hiring and firing is rampant, we follow stringent rules and regulation for recruiting and relieving of personnel. Therefore it is said that in Government, both the entry and exit is difficult. The reason being, it is done as per the set rules and regulations encompassing all governing legislations. Therefore in the context of Government organization it has a long term impact which can be considered on an average of 20-25 years of employment period.

In the employment life cycle the direct cost is salary and wages of an employee but there is huge indirect cost in terms of training, development, loss of time in case of mistakes/ omissions/ commissions etc. The considerable portion of salary and wages are linked with the wholesale price index, hence it is incremental. Therefore the employee cost in the Government Sector has long term impact on the profit and loss account of the company.

The research study shows that exorbitant employee cost was one of the reasons for closures of the organisations. Therefore it is necessary to keep eye on employee cost and manage it effectively. We should not create a problem of plenty in our organization. We are a family and a small family shall always be able to absorb shocks given by the external factors such as economical factor, business slow down, recession, competition etc.

The business scholars say that in today's time of thinner margin the profitability is not only achieved by enhancing revenue but also by reducing cost. Therefore today industry is looking at cost reduction and centric measures for long term sustainability.

We have been adding numbers in recent past on account of our expansion plan and retirements. However simultaneously, we also need to see that a large amount of investment we have made in automation, technology, business processes with an intention to reduce operating cost. In the recent past our employee cost went up considerably, however our revenue has not grown to that proportion. It has brought out need to study and benchmark our staffing norms with our comparables. In our organization we have given away the concept of job description with the introduction of new performance appraisal system for pay group I & II employees. As per the new method now the mutually agreed KRAs/KPIs shall form the job description. Similar new system shall evolve for pay group III & IV employees.

Some of our projects are coming to an end therefore there are chances of re-deployment and re-alignment of staff. Further the concept of multi-tasking, rationalization, capacity development etc need to be executed in order to utilize the manpower optimally. I urge to all that whenever we propose to add number we must keep it in mind the long term cost impact and therefore need to be very careful about such proposal. The experts say that it is better to be 20% less than 20% excess as technological advancement is inevitable in future and that will reduce human intervention.

## Management Information System (MIS) is an Art

We learnt in management that there are five (05) M' of managerial resources i.e. man, money, material, method and machine. In today's information world one more M' is added to these resources and i.e. MIS (Management Information System). The reason being, the information is knowledge and knowledge is wealth. However this information is to be presented in proper way and that is called analysis. The reason why it is called Management Information System and not merely Information System is because on the basis of information the managerial decisions are taken. Hence it is called Management Information System.

Managers are required to take or seek decisions. These decisions have to be based on the facts and data. The less the data/ information there will be more judgment. Hence it is essential to keep custody of day to day information which is required for decision making. This data/ information have to be up-dated and reliable. The quality of the decision shall squarely depend on the quality of the data/ information.

The journey of MIS starts with data. It is from the data, the information is extracted. The information then presented in a manner which will facilitate decision making and it is called analysis. It is an art of presenting information before the management. In this regard the following guidelines are given:

- Present only useful information for decision making. The information which is gathered but not useful for decision that need not be presented. The information gathered can be presented only when it is called for.
- The repetition/ duplication of the information to be avoided.
- Put first thing first. It is better to keep summary sheet first and then detail working sheet as per the priority, one after another.
- Classification, Sorting and clubbing of information wherever possible is necessary for ease in understanding.
- Avoid too many columns and too many rows.
- Keep it short and brief to the extent possible
- Give subtotals wherever possible and ensure those tally with other figures. Always compare previous figures with present figures.
- Give end result at the end.
- Ensure that purpose of information is achieved with the information presented.
- Write or keep ready your own findings.
- Use appropriate statistical tools like percentage, count, frequency, mean, mode etc.
- Write Index if information is in many pages.
- Take help of chart/ visual wherever required, it gives quick comparison of information.
- Use uniformity in numbers/ codes

# THE ENERGY CHALLENGE

By- Arvind Singh



The Indian economy is one of the fastest growing economies today inspite of the global financial meltdown. At the national level, availability of fuel and the financial health of power distribution utilities have been identified as major factors slowing down the creation of energy infrastructure. Land acquisition issues, litigation and delays in statutory clearances also limit the pace of infrastructure creation. The national goal of power to all by 2012 is a challenging goal that requires the generation of adequate and reliable energy. The Maharashtra State Electricity Transmission Company Ltd. has to cater to the demand of Maharashtra State Electricity Distribution Company Ltd and to various EHV consumers located in different parts of the State, in MIDC estates and SEZs. With the opening up of power generation to the private sector, many Independent Power Producers are setting up their units in the State. Evacuation of power from these IPPs as well as providing the required corridor for power transfer to Open Access consumers, on the intra state grid, is also its responsibility. Maharashtra is a leading industrial and urban state with a high demand for energy relative to other States. Commercialization and increase in irrigation acreage is raising the demand for energy in agriculture. Thus, adequate and timely capacity addition in the existing infrastructure has to be brought in along with renewed focus on demand management/energy conservation measures. Adoption of newer technologies in the sector has to be facilitated while encouraging investment in renewable sources of energy in the State.

**I. Maharashtra: Current Scenario**

The erstwhile MSEB was unbundled into three separate companies namely Maharashtra State Power Generation Company Ltd. (MAHAGENCO/MSPGCL), Maharashtra State Electricity Transmission Company Ltd.(MAHATRANSCO/MSETCL) and Maharashtra State Electricity Distribution CompanyLtd. MAHADISCOM/ MSEDCL) - as a part of the reforms agenda mandated by the new Electricity Act, passed in 2003. The State's unrestricted demand, as on 1st Feb. 2012, is 19,575MW: out of which the Mumbai region's demand is 2,435MW. With supply at 15,265 MW, the shortfall is met with load shedding of around 1,930MW while load relief of around 2,380MW is derived through load management schemes. (In order to optimize availability of power, MSEDCL has undertaken load management measures viz. segregation of agricultural load from Residential, Commercial, Industrial & Public Water Works loads in order to extend controlled power supply to Agriculture and Industry) As per the 17thElectric Power Survey, conducted by the Central Electricity Authority, the peak electric load in the State is expected to rise to nearly 22,000 MW shortly and go up even further in the medium term. Accordingly, the concerned utilities have planned for investment in Generation, Transmission and Distribution in such a way that complying with the aims and objectives of the National Electricity Policy (NEP); the existing deficit will be taken care of.

II. Initiatives to meet the challenge:

A) Generation: MAHAGENCO is implementing an ambitious expansion plan to meet the energy requirements of the future. These include setting up of Greenfield thermal plants and the expansion of its existing units, exploring the option of setting up new units following the PPP route. By 2015-16, MAHAGENCO aims to create power generation capacity of around 17,500 MW. Using supercritical generators at several locations, it aims to improve efficiency and reduce pollution. It is also expanding the gas-based generation at Uran, using modern combined cycle gas turbines. IPPs such as JSW Energy, Jaigad (1200 MW) and Wardha Power Co, Warora (540 MW) have been connected to the State grid recently and more such plants are due for commissioning in the coming years, adding to the available capacity.

B) Transmission: MSETCL - the largest state transmission utility in the country has 546 Extra High Voltage (EHV) substations, 87,341MVA of transformation capacity and 39,340 ckt kms of transmission lines spread over the State. It is

continue....

implementing an ambitious expansion plan over the period 2011-12 to 2015-16, to meet the evacuation and grid strengthening needs of the future. Power evacuation schemes for MAHAGENCO expansion plans at Chandrapur, Koradi, Paras, Khaparkheda, for NTPC at Mouda as well as for major IPPs such as M/s Adani at Bhandara, M/s Indiabulls at Amravati and M/s Lanco at Wardha, along with those for small IPPs, are currently under execution. Adoption of predictable maintenance practices has helped the utility reduce interruptions and improve the network's availability to 99.7%.

C) Distribution: MAHADISCOM - the distribution utility - has undertaken various measures such as setting up of call centres to deal with consumer grievances, online bill payment mechanism, Improving the connection release and outage management systems. To reduce distribution losses, efforts have been made to control power thefts and to set up efficient meters for proper billing. Steps have also been taken to increase revenue collection by recovering arrears of past bills. The separation of agriculture feeders has improved the utility's ability to manage peak loads, to better service industry and to bridge the demand-supply gap. It has also permitted new distribution franchisees at 3 urban centres, drawing lessons from its success at Bhiwandi.

D) Renewable Energy: Apart from providing adequate funding to the power utilities, the State has also encouraged the use of renewable sources of energy through Maharashtra Energy Development Agency (MEDA) - the agency established to channel incentives for investment in renewable energy. MEDA promotes generation from the following renewable/non-conventional sources:

(a) Non-fossil fuel (including bagasse) based co-generation,

(b) Wind Energy

(c) Biomass

(d) Small/Micro, Mini Hydro

(e) Municipal Waste

(f) Solar Power

The regulator, MERC, has issued Renewable Purchase Obligation (RPO) regulations setting targets for procuring energy by specifying the minimum quantum of purchase (in %) to be procured annually, for the period 2010-11 to 2015-16, from solar and non-solar sources of energy. In recent years, the State has seen a spurt in investment in renewable power generation; the leading contribution to the grid presently comes from wind farms and bagasse based cogeneration units.

D) Energy Conservation: Every unit of energy saved is equivalent to more than one unit of energy generated and this points to the urgency with which conservation measures have to be popularized. Urbanization is leading to the construction of more energy intensive residential and commercial units such as high-rise apartments/shopping malls while development in rural areas is fuelling the demand for more white goods/appliances such as TVs. There is a need to step up campaigns for less energy intensive construction and for the use of more energy efficient appliances. The State can only create the enabling environment, as these measures have to be accepted for adoption by the consumers of electric power. A related issue is that of the pricing of energy and it is now imperative to move to a more rational and cost reflective pricing system. Current pricing practices lead to over drawl of power by certain consumers and act as a deterrent to energy conservation. A serious relook is called for to improve efficiencies and incentivize energy conservation; while doing so the special needs of subsistence farmers and poor households in both rural and urban areas have to be kept in mind.


III. The Road Ahead

The worst phase of the energy crisis that the State has witnessed is now behind us. Both the public and the private sector have stepped up investment in infrastructure. New generation capacities from renewable sources are being created. Use of modern technology in the sector has to be speeded up to add to efficiencies, reduce costs and benefit consumers. Smart meters, Electric Vehicles and decentralized generation from renewables have caught the fancy of consumers in the developed world. Will we also follow that path or come up with our own innovative solutions? While our per capita consumption of electricity is low compared to that of advanced economies, there is a case for stepping up campaigns for energy conservation to curb its excessive use by some.

(This article is taken from the magazine " Harmony")

# सुविचार

- पैशाचे नाव अर्थ पण तो करतो मोठा अनर्थ (गोंदवलेकर महाराज)
- दुर्जनाला वेदांतात बुडवले तरी त्याला सुजनत्व येत नाही.
- त्याग हा सर्व प्रकारच्या कलेचा बिंदूच आहे. (महात्मा गांधी)
- युध्दाची खरी भयानकता त्यात माणसे मरतात ही नसून माणूस माणसाला मारायला तयार होतो ही आहे.
- जगात काही अजरामर नाही-तुमच्या चिंतासुध्दा!
- जेष्ठत्व केवळ वयामुळे नाही तर गुणांमुळे येते.
- लहान मुलांमध्ये आढळणारी चौकसवृत्ती म्हणजे ज्ञानाची भूक होय.
- आपले विचार वाळूत लिहा, क्षमेचे वारे त्यांना उडवून लावेल आपले सुख दगडात कोरा ते कोणीही खोडू शकणार नाही.
- सत्तेपेक्षा सामर्थ्य महत्त्वाचे असते.
- माणसाने आपल्या भरवंशावर जगावे.
- दीपज्योतीमध्ये असे सामर्थ्य आहे की स्वत: प्रज्वलीत होऊन दुसऱ्याला प्रज्वलीत करते.
- आयुष्यात निश्चित काही मिळवावयाचे असल्यास साहस असावयास पाहिजे.
- सानेगुरूजीचे वाड्मय म्हणजे संस्काराचा झरा !
- उगीच जिथे रूजत नाही तेथे बी पेरू नये.
- जिथे मोल जाणत नाही तिथे शब्द टाकू नये.
- संस्कारामुळे माणसाला खरे माणूसपण येते.
- ग्रंथहीन घर म्हणजे देहहीन शरीर.
- शब्द जपून वापरावेत, शब्दांची धार तलवारीपेक्षा तीक्ष्ण आहे.
- कलीयुग कलीयुग म्हणू नका कलीयुगाला कलायुग बनवा!
- मृत्यु नेहमी समीप आहे धरून चालावे त्यामुळे मन वैराग्यकडे वळते.
- अहंकार आणि लोभ हे माणासांच्या जीवनातील सर्वात मोठे दु:ख आहे.
- चंद्र आणि चंदनापेक्षा सज्जनांचा सहवास शीतल असतो.
- काजव्याला वाटते जग आपल्याच लुकलुकण्यामुळे उजळले आहे.
- कर्तव्यदक्ष असावे पण कर्मठ नसावे.
- उत्साही असावे पण उतावीळ होऊ नये.
- कृतज्ञ असावे पण कृतघ्न नसावे.
- पवित्र असावे पण पतित होऊ नये.
- त्याग करावा पण ताठा नसावा.
- स्वाभिमान असावा पण गर्व नसावा.
- आत्मविश्वास असावा पण अहंकार नसावा.
- स्वतंत्र असावे पण स्वैर नसावे.
- घाम गाळल्याशिवाय दामाची खरी किंमत कळत नाही.
- माणसाचे प्रेम है धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.
- सुखी होण्यासाठी सुखी होण्याचा मार्ग म्हणजे निसर्गावर, नियतीवर... परमेश्वरावर कोणावर तरी विश्वास ठेवा !
- मानवी संबंध धावणाऱ्या आगगाडीच्या वेळापत्रकाप्रमाण नसतात...ते असतात औदुबंराच्या आडव्यातिडव्या पाय वाटासारखे.
- श्रध्दा ही सामर्थ्यवान असते. कशावर तरी श्रध्दा ठेवल्याशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही.
- ज्याच्या जीवनामध्ये निश्चित ध्येय नसते त्यालाच वेळ घालविण्यासाठी साधन शोधण्याची गरज भासते.



महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित